

दैनिक

# राज्य लोकतंत्र

गणपती बाप्पा मोरया

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–१७७ | बुधवार दि.१६ सप्टेंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


## थोडक्यात...

### इम्रान खानला वाचवण्यासाठी क्रिकेटविश्व एकवटलं

कराचीः पाकिस्तान क्रिकेट संघाचे माजी कर्णधार आणि देशाला पहिला वनडे वर्ल्ड कप जिंकून देणारे इम्रान खान सध्या तुरुंगात आहेत. तुरुंगातील त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याच्या बातम्या समोर आल्यानंतर क्रिकेट विश्वातून त्यांच्या समर्थनार्थ आवाज उठू लागला आहे. आता ऑस्ट्रेलियाच्या तब्बल सात माजी कर्णधारांनी इम्रान खान यांच्या मदतीसाठी पुढाकार घेतला आहे. ऑस्ट्रेलियाच्या सात माजी कर्णधारांनी आपल्या देशाच्या परराष्ट्रमंत्री पेनी वोंग यांना पत्र लिहून इम्रान खान यांच्या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. तुरुंगातील त्यांच्या कथित खराब प्रकृतीबाबत या माजी कर्णधारांनी चिंता व्यक्त केली आहे. या पत्रावर ऑस्ट्रेलियाचे माजी कर्णधार आणि भारतीय संघाचे माजी प्रशिक्षक ग्रेग चॅपेल यांच्यासह ॲलन बॉर्डर, इयान चॅपेल, किम ह्यूज, मार्क टेलर, स्टीव्ह वॉ आणि ऑस्ट्रेलियाच्या महिला संघाची माजी कर्णधार बेलिंडा क्लार्क यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. ग्रेग चॅपेल यांनी परराष्ट्रमंत्री पेनी वोंग यांची भेट घेण्याची इच्छाही व्यक्त केली आहे. त्यांनी इम्रान खान यांना अखेरचे २०२२ मध्ये इस्लामाबादमध्ये भेटले होते. त्यावेळी इम्रान खान पाकिस्तानचे पंतप्रधान होते.

### यूपीआय शुल्कावरून काँग्रेस आक्रमक

नवी दिल्लीः देशातील डिजिटल व्यवहारांची प्रमुख ओळख बनलेल्या यूपीआयवरून आता राजकीय आरोप-प्रत्यारोपांना सुरुवात झाली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधत, २ हजार रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या व्यापारी वढक व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा मार्ग सरकारने खुला केला आहे असे म्हटले आहे. या शुल्काचा थेट भार ग्राहकांवर टाकला जाणार नसला तरी व्यापारी तो वस्तूंच्या किमतीतून ग्राहकांकडून वसूल करू शकतात असा युक्तिवाद राहुल गांधी यांनी केला आहे. त्यांनी या निर्णयामागे अमेरिकन पेमेंट कंपन्यांचा दबाव असल्याचाही आरोप केला आहे. मात्र, केंद्र सरकारने हा आरोप चुकीचा आणि दिशाभूल करणारा असल्याचे म्हटले आहे. राहुल गांधी यांनी सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले की, २ हजार रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या व्यवहारांची संख्या यूपीआय व्यवहारांच्या केवळ ५ टक्के असली, तरी त्यांच्या माध्यमातून होणाऱ्या एकूण व्यवहारमूल्याचा वाटा सुमारे ६५ टक्के आहे. सरकार ग्राहकांकडून कोणतेही शुल्क घेतले जाणार नसल्याचे सांगत आहे. मात्र, दुकानदार किंवा व्यापाऱ्यांकडून शुल्क घेतले गेले तर त्याचा पैसा कुठून येणार? अखेरीस तो वस्तूंच्या किमतीत समाविष्ट होऊन ग्राहकांच्या खिशातूनच जाण्याची शक्यता आहे, असा दावा त्यांनी केला.

### कावळ्याच्या शापाने गाय मरत नसते–राज ठाकरे

मुंबईः केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे दोन दिवसाच्या मुंबई दौऱ्यावर होते. या दौऱ्याच्या दिवशी सोमवारी (१४ सप्टेंबर) त्यांच्या अध्यक्षतेखाली नवी मुंबईतील सिडको प्रदर्शन केंद्रात हिंदी दिवस आणि सहावे अखिल राजभाषा संमेलन आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात अमित शहा यांनी महाराष्ट्राच्या बहुभाषिकतेचा उल्लेख केला. महाराष्ट्राच्या भूमीवर मराठीसोबतच कोकणी, गुजराती, सिंधी, हिंदी, कन्नड, वारली यांसह अनेक भाषांचा विकास झाला असून या सर्व भाषांचा सन्मान केला जात आहे. महाराष्ट्रापेक्षा मोठे बहुभाषिक राज्य देशात दुसरे नाही, असे त्यांच्याकडून आवर्जून नमूद करण्यात आले.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती,**

**बीड, दि.१५ सप्टेंबर २०२६**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५४.५० क्विंटल | २,६४० | ३,२९१ | २,८६७ |
| ज्वारी/हायब्रिड : ६०.०० क्विंटल | ३,००० | ५,२६० | ३,८३४ |
| मका/लोकल: ८.०० क्विंटल | २,४५३ | २,४५६ | २,४५४ |
| तूर : ३.०० क्विंटल | ८,१९० | ८,१९० | ८,१९० |
| उडीद : ४९.५० क्विंटल | ६,००० | ८,३५१ | ७,९६३ |
| बाजरी:३८.०० क्विंटल | २,२०० | ३,३०१ | २,८४१ |
| मुग: ८.०० क्विंटल | ८,३०१ | ९,३०१ | ९,०३२ |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ५,२२६ | ५,८०१ | ५,५१३ |
| हरभरा:३.५० क्विंटल | ५,५०० | ६,१०० | ५,८३३ |

# पावसाने दगा दिला; सरकार म्हणते शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही!

## ४५ दिवसांच्या खंडाने खरीप होरपळला; चारा-पाण्याचे संकट गडद

मुंबई । प्रतिनिधी

**राज्यातील अनेक भागांत पावसाने तब्बल ४० ते ४५ दिवसांची ओढ दिल्याने खरीप हंगाम गंभीर संकटात सापडला आहे. पावसाअभावी सोयाबीन, कापूस, मका, तूर, मूग, उडीद यासह कांदा, ऊस, फळबागा आणि भाजीपाला पिकांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. त्यातच पावसाचा खंड आणखी वाढल्यास जनावरांच्या चारा-पाण्याचे संकटही उभे राहण्याची भीती आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांमध्ये चिंता वाढली असतानाच, 'कुठल्याही शेतकऱ्याला वाऱ्यावर सोडणार नाही,' अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिली.**

मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना फडणवीस यांनी राज्यातील पावसाच्या परिस्थितीचा गंभीरपणे आढावा घेतल्याचे सांगितले. अनेक जिल्ह्यांत पावसाचा ताण ३० दिवसांहून अधिक झाला असून, काही भागांत हा खंड ४५ दिवसांपर्यंत पोहोचला आहे. मंत्रिमंडळ बैठकीत प्रत्येक जिल्ह्याचे सादरीकरण घेण्यात आले. कोणत्या तालुक्यात किती पाऊस झाला, पावसाचा खंड किती दिवसांचा आहे आणि त्याचा खरीप पिकांवर काय परिणाम झाला आहे, याची माहिती सरकारने घेतली. पावसाच्या खंडामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर सरकारने आतापासूनच दुष्काळी उपाययोजनांची तयारी सुरू केली आहे. शेतकऱ्यांना आवश्यक असलेली मदत कोणत्या पद्धतीने देता येईल, ▶▶ पान २ वर



### पिकांसोबत चारा-पाण्याचीही चिंता

जुलै आणि ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यानंतर अनेक भागांत पावसाने पाठ फिरवल्याने खरीप पिकांच्या वाढीवर परिणाम झाला आहे. पावसाचा खंड आणखी लांबल्यास उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. दुसरीकडे, जलसाठ्यांवरही त्याचा परिणाम होण्याची शक्यता असल्याने ग्रामीण भागात पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न डोके वर काढू शकतो.

# जरांगे पाटलांची मुंबईकडे कूच, डोळ्यात अश्रू!

## गणेशोत्सवामुळे मुंबईच्या वेशीवरच अडवले जाण्याची शक्यता

जालना । प्रतिनिधी

मनोज जरांगे हे अंतरवाली सराटी येथील उपोषणाची जागा सोडून ते मंगळवारी मुंबईकडे रवाना झाले आहेत. मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलन करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, अंतरवाली सराटी येथून निघताना मनोज जरांगे पाटील भावूक झाले. गाडीत बसताच त्यांना अश्रू अनावर झाले. त्यांनी समाजाच्या लेकरांसाठी लढत ▶▶ पान २ वर

### कॅबिनेट बैठकीत जरांगेंच्या भाषेवर मंत्र्यांचा आक्षेप

मनोज जरांगे यांच्या भाषेचे पडसाद मंगळवारच्या कॅबिनेट बैठकीत उमटल्याची सूत्रांची माहिती आहे. जरांगेंकडून वापरली जाणारी भाषा अयोग्यच आहे, असे म्हणत सर्व मंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केल्याची माहिती आहे. राज्य सरकार मराठा समाजासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेत असताना आंदोलनकर्त्यांकडून घेतली जाणारी भूमिका आक्षेपार्ह असल्याची भूमिका बैठकीनंतरच्या चर्चेत मंत्र्यांनी मांडली. हिंदू उत्सवाच्या काळातच मुंबईत आंदोलन का, असा सवालही मंत्र्यांकडून कॅबिनेट बैठकीत उपस्थित करण्यात आला, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली.



बीडः पोलिसांनी मुंबई येथील उपोषणाची परवानगी नाकारल्यानंतर मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील मुंबईकडे जात असताना ठिकठिकाणी त्यांचे मोठ्या संख्येने स्वागत करण्यात आले बीड जिल्ह्यामध्ये त्यांच्या स्वागतासाठी जमलेला जनसमुदाय

## जावक विभागात खाडाखोड प्रकरण अंगलट येणार

# बीडः शिक्षक भरतीप्रकरणी त्रिस्तरीय समितीकडून चौकशी

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात तथाकथित शिक्षक भरती तक्रार प्रकरणी चौकशीसाठी मंगळवारी शिक्षण विभागात त्रिस्तरीय समितीने चौकशी सुरू केली.**

जिल्हा परिषदेच्या माध्यमिक आणि प्राथमिक शिक्षण विभागात शिक्षण भरती प्रकरणी झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने यासाठी स्थापन करण्यात आली आहे. या समितीने माध्यमिक आणि प्राथमिक या दोन्ही विभागातील बोगस शालार्थ आयडी आणि भरती संदर्भात चौकशी करून संबंधिताचे जबाब नोंदवले आहे. मंगळवार दिनांक १५ रोजी बीड जिल्हा परिषदेमध्ये त्रिस्तरीय समिती दाखल झाली शिक्षण विभागातील आवक, जावक रजिस्टरची संबंधिताने चौकशी केली. यामध्ये जाऊ कनिष्ठ मध्ये खाडाखोड करून संगणकृत टाईप करून पान चिटकविण्यात आले आहे. याबाबत ▶▶ पान २ वर

# आमदारांनी वेगळी भूमिका घेतली तीच शिवसेनेतील राजकीय फूट

● एकनाथ शिंदेंच्या वकिलांचा जोरदार युक्तिवाद, ठाकरेंचे मुद्दे खोडून काढले

दिल्ली । वृत्तसंस्था

शिवसेनेच्या बाबतीत विधानसभा अध्यक्ष आणि निवडणूक आयोगाने जो निकाल दिला तो योग्यच असून घटनेचे कोणतंही उल्लंघन झाले नाही. त्यामुळे निवडणूक आयोगाने शिवसेना ही एकनाथ शिंदे यांच्याकडेच ठेवण्याचा निर्णय घेतला, असा युक्तिवाद ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी केला. पक्ष आणि चिन्ह कुणाचे हे आमदार आणि खासदारांच्या संख्येवर ठरवण्यात आले आणि निवडणूक आयोगाला तसा निर्णय घेण्याचा अधिकार आहे, अशा दावाही नीरज किशन कौल यांनी केला.



निवडणूक आयोगाने विधिमंडळातील फूट म्हणजे राजकीय फूट समजून शिवसेना शिंदेंना दिल्याचा दावा ठाकरेंचे वकील कपिल सिब्बल यांनी केला होता. सिब्बलांचा हा मुद्दा खोडून काढताना नीरज किशन कौल यांनी युक्तिवाद केला. उद्धव ठाकरे यांनी शिवसेनेच्या ▶▶ पान २ वर

# खनिज चोरांची आता खैर नाही; सरकार ठेवणार 'डिजिटल' वॉच!

## 'महाखनिज २.०' प्रणालीचे लोकार्पण; २५ हजार कोटींच्या महसुलाचे उद्दिष्ट

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील गौण खनिजांचे उत्खनन, वाहतूक, परवाना आणि देखरेख प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता व कार्यक्षमता आणण्यासाठी महसूल विभागाने तयार केलेल्या 'महाखनिज २.०' या अत्याधुनिक डिजिटल प्रणालीचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मंत्रिमंडळ बैठकीत करण्यात आले.

गौण खनिजांच्या व्यवस्थापनाची पारंपरिक प्रक्रिया ही मोठ्या प्रमाणात कागदी व मानवी हस्तक्षेपाची असल्याने त्यात देखरेख ठेवताना अनेक अडचणी येत होत्या. त्यावर मात करत गौण खनिज प्रशासनाला अत्याधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे प्रशासनात डिजिटल क्रांती घडून येत आहे. महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांनी याबद्दलचे सादरीकरण केले. यावेळी कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, सहसचिव ▶▶ पान २ वर

# जनता दरबार सुरू असतानाच धनंजय मुंडेंची प्रकृती बिघडली; तातडीने रुग्णालयात दाखल

परळी । प्रतिनिधी

**माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे परळीचे आमदार धनंजय मुंडे यांची प्रकृती अचानक बिघडल्याची माहिती समोर आली आहे. मंगळवारी सकाळी जनता दरबार सुरू असताना त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने तातडीने रुग्णालयात दाखल**



**करण्यात आले. सध्या डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.**

सकाळी नेहमीप्रमाणे परळी येथील शासकीय विशेष अतिथीगृहात धनंजय मुंडे यांच्या जनता दरबाराचे आयोजन करण्यात आले होते. नागरिकांच्या भेटीगाठी आणि त्यांच्या ▶▶ पान २ वर

# 'मंत्र्यांच्या घरात रोकड सापडली असती तर काय केले असते?'

## न्यायमूर्ती यशवंत वर्मा प्रकरणावर ज्येष्ठ विधिज्ञ हरिश साळवेंचा थेट सवाल; न्यायव्यवस्थेच्या उत्तरदायित्वावरही उपस्थित केले गंभीर प्रश्न

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या निवासस्थानी जळलेल्या नोटा सापडल्याच्या प्रकरणाच्या हाताळणीवर ज्येष्ठ विधिज्ञ हरिश साळवे यांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. ''अशीच रोकड जर एखाद्या मंत्र्याच्या घरात सापडली असती तर आपण काय केले असते?'' असा थेट सवाल करत साळवे यांनी या प्रकरणात कायद्यानुसार कारवाई का होऊ दिली गेली नाही, तसेच कोणताही फौजदारी खटला का दाखल झाला नाही, अशी विचारणा केली. नवी दिल्ली येथे आयोजित राम जेठमलानी स्मृती व्याख्यानमालेत ते बोलत होते.



न्यायव्यवस्थेच्या स्वायत्ततेच्या नावाखाली न्यायाधीशांना चौकशीपासून संरक्षण देता येणार नाही, असे साळवे यांनी स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाच्या 'जस्टिस व्ही. रामास्वामी' निकालातील तरतुदी या पक्षकारांकडून केल्या जाणाऱ्या क्षुल्लक किंवा खोडसाळ तक्रारींपासून ▶▶ पान २ वर

### न्यायाधीशांच्या वैयक्तिक भूमिकेला मर्यादा हव्यात

संविधानाच्या रक्षणासाठी 'मूलभूत संरचना तत्त्व' महत्त्वाचे असल्याचे मान्य करतानाच न्यायाधीशांच्या वैयक्तिक दृष्टिकोनातून कायदेमंडळाच्या अधिकारांच्या सीमा ठरविल्या जाऊ नयेत, असा इशाराही साळवे यांनी दिला. सोशल मीडियावरील चर्चा किंवा दबावाचा न्यायालयीन कामकाजावर परिणाम होता कामा नये. न्यायाधीशांनी सोशल मीडियावरील चर्चेतून नव्हे, तर त्यांच्या निकालांमधून बोलावे, असेही त्यांनी स्पष्ट केले. भारताची न्यायव्यवस्था आपल्यासमोरील आव्हानांवर मात करू शकते, असा विश्वास व्यक्त करत साळवे यांनी न्यायव्यवस्थेने संस्थात्मक पातळीवर आत्मपरीक्षण करण्याची गरज अधोरेखित केली. संपूर्ण न्यायव्यवस्थेची कार्यपद्धती, उत्तरदायित्व आणि नियुक्तीची प्रक्रिया यांचा नव्याने विचार करून आवश्यक त्या सुधारणा करण्याची वेळ आली आहे, असा संदेश त्यांच्या भाषणातून देण्यात आला.

# राज्यात ८ हजारांहून अधिक जागांसाठी पोलीस भरती!

## जानेवारीपासून होणार प्रक्रियेला सुरुवात

मुंबई । प्रतिनिधी

**सरकारी नोकरीच्या शोधात असलेल्या आणि पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या तरुणांसाठी मोठी आणि महत्त्वाची बातमी आहे. महाराष्ट्रात पुन्हा एकदा पोलीस भरती प्रक्रिया राबवण्यात येणार असून ८,१०० पोलीस अंमलदारांची पदे भरली जाणार आहेत. त्यामुळे राज्यभरातील पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या लाखो उमेदवारांसाठी ही मोठी संधी ठरणार आहे.**

जून २०२७ पर्यंत रिक्त होणाऱ्या पोलीस अंमलदारांच्या पदांचा विचार करून ही भरती करण्यात येणार असल्याची माहिती आहे. जानेवारी २०२७ पासून भरती प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता असून, त्याआधी डिसेंबर २०२६ मध्ये उमेदवारांना अर्ज करता येणार आहे. ▶▶ पान २ वर

## अग्रलेख

# कुरुंदवाडचा एकोपा विरुद्ध राष्ट्रीय राजकारण

## मशिदीत गणरायाची प्रतिष्ठापना; दिल्लीच्या ध्रुवीकरणाच्या राजकारणाला गावाकडून आरसा

महाराष्ट्रातील कोल्हापूर जिल्ह्यातील कुरुंदवाड या ऐतिहासिक नगरीने मशिदींमध्ये गणपती बाप्पाची प्रतिष्ठापना करून हिंदू-मुस्लिम ऐक्याचा जो आदर्श घालून दिला आहे, तो आजच्या धार्मिक ध्रुवीकरणाच्या वातावरणात अधिकच महत्त्वाचा ठरतो. १९८२ पासून सुरू असलेली ही परंपरा केवळ दोन धर्मांच्या सलोख्याची कहाणी नाही; ती भारतीय संस्कृतीच्या बहुविध आणि सहअस्तित्वाच्या स्वभावाचे दर्शन घडवते. एका बाजूला कुरुंदवाडमध्ये आरती आणि अजाण एकाच सामाजिक अवकाशात घुमत असताना, दुसऱ्या बाजूला राष्ट्रीय राजकारणात धर्माच्या आधारावर वाढणारी दरी चिंतेचा विषय ठरते.

कुरुंदवाडमध्ये मोहरम आणि गणेशोत्सव एकाच वेळी आले तरी संघर्षाचा मार्ग न स्वीकारता दोन्ही समाज एकमेकांच्या सणात सहभागी होतात. मशिदीत गणरायाची स्थापना, मुस्लिम बांधवांकडून बाप्पाला 'रोठ' आणि 'मलिद्याचा' प्रसाद, तर हिंदू बांधवांकडून मोहरममध्ये पिराला नैवेद्य ही परंपरा कोणत्याही सरकारी आदेशाने निर्माण झालेली नाही. ती उभी राहिली आहे ती परस्पर विश्वासावर. धर्माच्या भिंती राजकारणापेक्षा सामान्य माणूस अधिक सहजपणे पाडू शकतो, याचे कुरुंदवाड हे जिवंत उदाहरण आहे. याच पार्श्वभूमीवर केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारच्या अल्पसंख्याक धोरणाकडे पाहावे लागते. 'सबका साथ, सबका विकास' ही घोषणा वारंवार केली जाते; परंतु तिचा प्रत्यक्ष सामाजिक अनुभव सर्व समुदायांना समानपणे येतो आहे का, हा प्रश्न कायम आहे. सरकार आपल्या योजनांचा लाभ सर्व नागरिकांना मिळत असल्याचा दावा करते; मात्र मुस्लिम समाजाबाबत भेदभावाची भावना निर्माण झाल्याची टीका विरोधक, सामाजिक संघटना आणि विविध अभ्यासकांकडून होत आहे. लोकशाहीत केवळ सरकारी आकडे महत्त्वाचे नसतात; नागरिकांच्या मनात समानतेची आणि सुरक्षिततेची भावना आहे का, हेही तितकेच महत्त्वाचे असते. गेल्या काही वर्षांत धार्मिक ध्रुवीकरण, द्वेषयुक्त वक्तव्ये, बुलडोझर कारवाई आणि निवडणूक प्रचारातील धार्मिक मुद्द्यांवरून देशात तीव्र वाद झाले. प्रत्येक घटनेचे कायदेशीर आणि राजकीय स्वरूप वेगळे असले, तरी त्यातून एका प्रश्नाकडे दुर्लक्ष करता येत नाहीराजकारणासाठी धार्मिक ओळखी अधिक तीव्र केल्या जात असतील, तर त्याची किंमत सामाजिक ऐक्याला तर मोजावी लागत नाही ना? सीएए आणि एनआरसीसारख्या विषयांवरही अशीच चिंता व्यक्त झाली. सरकारची भूमिका आणि कायद्याची तरतूद एक बाब; परंतु एखाद्या समुदायाच्या मनात आपल्या नागरिकत्वाबद्दल किंवा देशातील स्थानाबद्दल असुरक्षितता निर्माण होत असेल, तर ती दूर करण्याची जबाबदारी सत्ताधाऱ्यांचीच आहे. नागरिकाचे राष्ट्रप्रेम त्याच्या धर्मावर ठरू शकत नाही. संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानतेचा अधिकार दिला आहे आणि हाच भारतीय राष्ट्रवादाचा मूलाधार आहे. निवडणुका जिंकण्यासाठी बहुसंख्य समाजाच्या भावनांचे राजकीय ध्रुवीकरण करणे कदाचित तात्कालिकदृष्ट्या फायदेशीर ठरू शकते; पण त्यातून समाजात कायमस्वरूपी अविश्वास निर्माण झाला तर त्याचा फटका संपूर्ण देशाला बसतो. बहुसंख्यांच्या भावनांचा सन्मान जितका आवश्यक आहे, तितकाच अल्पसंख्याकांच्या सुरक्षिततेचा आणि सन्मानाचा अधिकारही महत्त्वाचा आहे. लोकशाही म्हणजे केवळ बहुमताचे राज्य नव्हे; बहुमताच्या सत्तेत अल्पमताच्या अधिकारांचे संरक्षण करण्याची जबाबदारीही आहे. कुरुंदवाडच्या मशिदीत 'गणपती बाप्पा मोरया'चा जयघोष होतो आणि त्याच समाजजीवनात 'या हुसेन'चा आवाजही घुमतो. हा आवाज कोणत्याही एका धर्माचा नसून भारताच्या सहअस्तित्वाच्या संस्कृतीचा आहे. तिथे धर्म कोणाचा मोठा, हा प्रश्न नाही; तर एकमेकांच्या श्रद्धेला सन्मानाने जागा कशी द्यायची, हा प्रश्न आहे. देशाला आर्थिक महासत्ता बनवण्याचे स्वप्न आवश्यक आहे; परंतु नागरिकांच्या मनातील दुरावा वाढत असेल तर विकास अपुरा ठरतो. रस्ते, पूल आणि इमारती देशाची भौतिक प्रगती दाखवतात; मात्र हिंदू-मुस्लिम एकमेकांच्या सणात सहभागी होत असतील, तेव्हा देशाच्या सामाजिक प्रगतीचे दर्शन घडते. म्हणूनच कुरुंदवाड हा केवळ कोल्हापूर जिल्ह्यातील एक छोटा अपवाद राहू नये. तो राष्ट्रीय आदर्श ठरावा. मशिदीत गणरायाची प्रतिष्ठापना करणाऱ्या सामान्य नागरिकांकडून सत्तेच्या दिल्लीने धडा घेण्याची गरज आहे. कारण भारताची खरी ताकद कोणत्या धर्माची संख्या किती, यात नाही; तर भिन्न श्रद्धांचे लोक एकमेकांच्या श्रद्धेला सन्मान देऊन एकत्र जगतात की नाही, यात आहे. कुरुंदवाडने आपला मार्ग निवडला आहेएकोप्याचा. आता प्रश्न राष्ट्रीय राजकारणासमोर आहे : भारताला कुरुंदवाडच्या या मार्गावर न्यायचे की धर्माच्या ध्रुवीकरणातून मतांचे गणित अधिक घट्ट करायचे?

# दुष्काळाच्या संकटातून बीड जिल्ह्याला बाहेर काढ, बाप्पाकडे साकडे

## परशुराम संस्कार सेवा संघ महाराष्ट्र, बीडच्या वतीने श्री गणेशाची स्थापना

**बीड | प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्यावर यंदा दुष्काळाचे गंभीर संकट घोंगावत असून, पाण्याचे स्रोत आटत चालले आहेत. अनेक धरणांमध्ये अत्यल्प पाणीसाठा शिल्लक राहिला असून काही धरणे अक्षरशः कोरडी पडण्याच्या मार्गावर आहेत. पाऊस लांबल्याने शेतकरी, पशुधन आणि सर्वसामान्य नागरिक चिंतेत असताना ''हे गणराया, बीड जिल्ह्याला दुष्काळाच्या संकटातून बाहेर काढ आणि भरपूर पाऊस पाड'', अशी आर्त हाक देत परशुराम संस्कार सेवा संघ महाराष्ट्र, बीडच्या वतीने श्री गणेशाची स्थापना करण्यात आली.**



गणेशोत्सवानिमित्त परशुराम संस्कार सेवा संघ, बीड जिल्हा कार्यालयात बीड जिल्हा कार्याध्यक्ष श्री. प्रसाद कुलकर्णी यांच्या हस्ते श्री गणेशाची विधिवत प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी संस्थापक अध्यक्ष श्री. गजाननराव जोशी, महाराष्ट्र अध्यक्ष श्री. बाळासाहेब थिगळे, महाराष्ट्र सचिव श्री. संजयराव कुलकर्णी, मराठवाडा अध्यक्ष श्री. विनायकराव देशमुख, जिल्हाध्यक्ष श्री. मुकुंदराव खडकीकर, शहराध्यक्ष श्री. रविंद्र हासेगावकर, श्री. संजयराव क्षीरसागर, खिंडरे साहेब यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी श्री गणरायाची आरती करून बीड जिल्ह्यातील दुष्काळाचे सावट दूर व्हावे, शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, विहिरी, तलाव व धरणांमध्ये मुबलक पाणीसाठा निर्माण व्हावा आणि जिल्ह्यात सर्वदूर समाधानकारक पाऊस पडावा, अशी प्रार्थना करण्यात आली. मराठवाड्यातील बीड जिल्हा कायमच पाणीटंचाई आणि दुष्काळाच्या संकटाला सामोरा जात आहे. यंदाही पावसाने ओढ दिल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनत चालली आहे. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर ''विघ्नहर्त्या गणराया, बीड जिल्ह्यावरील दुष्काळाचे विघ्न दूर कर आणि जिल्ह्यात सुख-समृद्धी नांदू दे'', अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# जिल्हा शिवसेनेच्या वतीने पाटलांचे जोरदार समर्थन



**बीड | प्रतिनिधी**

जिल्हयाच्या वतीने जिल्हाप्रमुख तथा मराठा सेवक गणेश भाऊ वरेकर यांच्या नेतृत्वाखाली व तालुकाप्रमुख तथा मराठा सेवक गोरख अण्णा सिंघन यांच्या प्रमुख उपस्थितीत मराठा संघर्ष यौद्धा मनोजदादा जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ बीड शहरातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यासमोर जोरदार घोषणाबाजी करत फडणवीस व शिंदे सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे, युती शासनाचा धिकार असो ,लढेंगे जितेंगे हम सब जरांगे, मनोज दादा जरांगे पाटील यांचा विजय असो अशा घोषणा देऊन जोरदार समर्थन करण्यात आले , जिल्हा शिवसेनेच्या वतीने यावेळी दिवसभर अल्पोपहार व पाणी वाटप करण्यात आले, तसेच मुंबईला जाण्यासाठी मराठा सेवक व शिवसैनिक यांची वाहनांची व्यवस्था करण्यात आली यावेळी जिल्हाभरातील मराठा सेवक व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मान्सूनचा परतीचा प्रवास १९ सप्टेंबरपासून हवामान विभागाचा महत्त्वपूर्ण अंदाज

**मुंबई | प्रतिनिधी**

**१९ सप्टेंबर २०२६ च्या आसपास पश्चिम राजस्थानच्या काही भागांतून नैऋत्य मान्सूनच्या परतीचा प्रवास सुरू होण्यासाठी पोषक वातावरण तयार होत असल्याचेही हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, दक्षिण-पूर्व राजस्थान आणि लगतच्या उत्तर गुजरातवर निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे गुजरात, सौराष्ट्र आणि कच्छ भागात जोरदार पावसाचाइशारा भारतीय हवामान विभागाने दिला आहे.**

हवामान विभागाने जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, दक्षिण-पश्चिम मध्य प्रदेश परिसरात निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र पुढे सरकून दक्षिण-पूर्व राजस्थान आणि उत्तर गुजरातवर स्थिरावले आहे. या कमी दाबाच्या क्षेत्राशी संबंधित चक्रीय वाऱ्यांची स्थिती झारखंड, मध्य प्रदेश आणि उत्तर छत्तीसगडपर्यंत विस्तारलेली आहे. याशिवाय, उत्तर-पश्चिम बंगालच्या उपसागरासह ओडिशा आणि पश्चिम बंगालच्या किनारपट्टीवरही हवेच्या वरच्या थरात चक्रीय वारे सक्रिय आहेत. कमी दाबाच्या प्रभावामुळे सौराष्ट्र आणि कच्छमध्ये काही ठिकाणी अतिमुसळधार ते अत्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच कच्छ, मोरबी, जामनगर, देवभूमी द्वारका, पोरबंदर, जुनागढ, गिर सोमनाथ आणि राजकोट जिल्ह्यांतील पाणलोट क्षेत्रांमध्ये अचानक पूर येण्याचा धोका वर्तवण्यात आला आहे. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. कोकण आणि गोव्यात अनेक भागांत पावसाचा जोर राहील, तर विदर्भात व्यापक स्वरूपाचा पाऊस पडण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. मराठवाड्यात मात्र पुढील काही दिवस हलक्या ते तुरळक सरींची शक्यता आहे. या वर्षी देशात मान्सून सरासरीच्या खूप कमी ८४ टक्के इतका पाऊस झाला आहे. त्यामुळे देशाच्या ३९ टक्के भू-भागावर दुष्काळसदृश स्थिती आहे. सप्टेंबरमध्ये परतीच्या पावसाकडून अपेक्षा असतानाच १९ सप्टेंबर रोजी मान्सून राजस्थानातून माघारी फिरणार असल्याची घोषणा हवामान विभागाने केली आहे.

# राज्यभरात एसटी बसस्थानकांवर १२५ 'हिरकणी कक्ष' उभारणार!

## टोयोटा किर्लोस्करसोबत सामंजस्य करार

**मुंबई | प्रतिनिधी**

**महाराष्ट्रातील लाखो महिला प्रवाशांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि सन्मानाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेडसोबत १२५ 'हिरकणी कक्ष' उभारण्यासाठी सामंजस्य करार केला आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा महत्त्वपूर्ण करार संपन्न झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची प्रमुख उपस्थिती होती. महिलांना, विशेषतः स्तनदा मातांना, प्रवासादरम्यान आपल्या बाळाची काळजी घेण्यासाठी स्वच्छ, सुरक्षित आणि खासगी जागा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने 'हिरकणी कक्ष' उभारण्यात येणार आहेत. एसटीच्या बसस्थानकांवर मातृत्वाला आवश्यक असलेली संवेदनशीलता आणि सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रकल्पासाठी टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेड आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमांतर्गत सहकार्य करणार आहे. सामंजस्य करारानुसार राज्यातील एसटी बसस्थानकांवर अंदाजे ३ मीटर ३ मीटर आकाराचे प्री-फॅब्रिकेटेड 'हिरकणी कक्ष' उभारण्यात येणार आहेत. या कक्षांमध्ये मातांना स्तनपानासह बाळाची निगा राखण्यासाठी आवश्यक अशी सुरक्षित आणि खासगी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासोबतच आवश्यक फर्निचर, फिक्स्चर, अंतर्गत वायरिंग, विद्युतीकरण तसेच इलेक्ट्रॉनिक साहित्य यांचाही समावेश प्रकल्पात करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी एसटी महामंडळाकडून सुमारे ५ बाय ५ मीटर जागा उपलब्ध करून देणे, आवश्यक वीज, पाणी आणि स्थापनेसाठी सहकार्य करणे तसेच आवश्यक शासकीय परवानग्या मिळविणे अपेक्षित आहे. प्रकल्प पूर्ण होऊन साहित्य व सुविधा महामंडळाकडे हस्तांतरित झाल्यानंतर कक्षांचे संचालन, सुरक्षा, दुरुस्ती, देखभाल आणि देखरेख करण्याची संपूर्ण जबाबदारी एसटीची राहणार आहे.

# पान १ वरून...

### पावसाने दगा दिला; सरकार म्हणते

याचा आराखडा तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार ताकदीने उभे राहील आणि त्यांना आवश्यक ती मदत केली जाईल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. दुष्काळी मदतीसाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषांचा संदर्भ देताना फडणवीस यांनी महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले. एनडीआरएफच्या निकषांनुसार दुष्काळाचा अधिकृत सर्व्हे ५ ऑक्टोबरनंतर करावा लागतो. मात्र, शेतकऱ्यांची अवस्था गंभीर असताना ५ ऑक्टोबरपर्यंत सरकार हातावर हात ठेवून बसणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. ५ ऑक्टोबरपूर्वीच प्राथमिक माहिती घेण्यास सुरुवात करण्यात आली असून, ५ ऑक्टोबरपासून अधिकृत सर्व्हे सुरू केला जाईल. पुढील आठ ते दहा दिवसांत हा सर्व्हे करण्याचे नियोजन असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे निर्माण झालेली परिस्थिती पाहता राज्यात तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. पिकांचे नुकसान, पाणीटंचाई, चारा उपलब्धता आणि ग्रामीण रोजगाराचा प्रश्न लक्षात घेऊन सरकारने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. आता सरकारच्या दुष्काळी आराखड्यात प्रत्यक्ष शेतकऱ्यांना किती आणि कधी मदत मिळते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

------------

### जरांगे पाटलांचे मुंबईकडे कूच,

राहण्याचा निर्धार व्यक्त केला. सरकारला शरण जाणार नसून, मराठा आरक्षणाच्या मागणीची अंमलबजावणी झाल्याशिवाय थांबणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आपल्या मागण्यांसाठी गेल्या १७ दिवसांपासून उपोषण करत आहेत. मात्र, शासनाकडून पाहिजे तसा प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांनी आता मुंबईकडे कूच केली आहे. अंतरवाली सराटीतून मंगळवारी त्यांनी आपला मोर्चा मुंबईकडे वळवला असून आझाद मैदानात ते उपोषणाला बसणार आहेत. विशेष म्हणजे, यापूर्वी दोनवेळा मुंबई पोलिसांनी जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनाला परवानगी नाकारली आहे. तरीही जरांगे पाटील मुंबईकडे नियोजित दौऱ्यानुसार निघाले आहेत. दरम्यान, मराठा आंदोलनाबाबत मुंबई पोलिसांकडून जरांगे पाटलांना परवानगी दिली जाणार नाही. त्यामुळे, मुंबईच्या वेशीवरच त्यांना अडवले जाण्याची शक्यता आहे. सध्या राज्यभर गणेशोत्सवाचा उत्साह असून पुणे आणि मुंबईत मोठ्या प्रमाणात गर्दी आणि भाविकांची रांग सार्वजनिक मानाच्या गणपती बाप्पांच्या दर्शनासाठी पाहायला मिळत आहेत. त्यामुळे, मुंबईत गणेशोत्सव असल्याने जरांगे पाटलांच्या आंदोलनामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवू शकतो. अशातच जमावबंदीच्या आदेशानुसार जर का कोणाला आंदोलन करायचे असेल तर रीतसर पोलिसांची परवानगी घेणे बंधनकारक आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार आंदोलनास फक्त आझाद मैदानावर इतर अटी शर्तींच्या आधारे परवानगी देण्यात येते. मात्र, रीतसर परवानगी न घेता आंदोलनाचा प्रयत्न केल्यास आंदोलकांवर कायदेशीर कारवाई केली जाते. गनिमी काव्याने जरी आंदोलनाचा प्रयत्न केला तर गुन्हा दाखल केला जाऊ शकतो. त्यामुळे, जरांगे पाटलांना मुंबईच्या वेशीवरच पोलिसांकडून अडवले जाण्याची शक्यता आहे. दरम्यान, सरकारने जरांगे पाटलांच्या सर्व मागण्या मान्य केल्या असून काही मागण्यांबाबत कायदेशीर अडचण आणि संविधानिक बाबींचा उल्लेख करत सरकारकडून वेळ मागितला जात आहे. दरम्यान, मनोज जरांगेंचा मंगळवारचा मुक्काम पाटोद्यात असणार आहे. एकीकडे मनोज जरांगे मुंबईकडे रवाना झाले आहेत, तर दुसरीकडे मराठा आंदोलकांकडून आझाद मैदानाची पाहणी करण्यात आली. मुंबई पोलिसांनी आंदोलनाला परवानगी नाकारली असतानाही मराठा आंदोलकांकडून ही पाहणी करण्यात आली. मराठा समन्वयक प्रशांत सावंतांनी मैदानाची पाहणी केली.

------------

### आमदारांनी वेगळी भूमिका घेतली तीच

विचारधारेच्या विरोधात भूमिका घेत काँग्रेससोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्याचवेळी आमदार आणि खासदारांनी वेगळी भूमिका घेतली. आमदार आणि खासदारांनी वेगळी भूमिका घेणे म्हणजेच पक्षातील राजकीय फूट होती, असा युक्तिवाद नीरज किशन कौल यांनी केला. सर्वोच्च न्यायालयात शिवसेना ठाकरे गटाने २०२४ मध्ये दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी सुरू आहे. या याचिकेत महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांनी संविधानाच्या १० व्या अनुसूचीअंतर्गत शिंदेंच्या शिवसेना आमदारांना अपात्र ठरवण्यास नकार दिला होता. अध्यक्षांच्या या निर्णयाला आव्हान देण्यात आले आहे. तसंच, शिवसेनेचा अधिकृत पक्ष म्हणून एकनाथ शिंदे यांच्या गटाला मान्यता देण्याच्या निवडणूक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिकाही सर्वोच्च न्यायालयासमोर सुनावणीसाठी सूचीबद्ध आहे. राजकीय पक्षामधील वाद म्हणजे त्या पक्षात दोन गट पडले पाहिजेत असे नाही. ते वाद हे वेगवेगळ्या स्वरुपात असू शकतात. जर आमदार आणि खासदारांनी वेगळी भूमिका घेतली तर तो देखील राजकीय वाद असतो. त्या आधारे निवडणूक आयोगाला निर्णय घेण्याचा अधिकार असल्याचा दावा नीरज किशन कौल यांनी केला. या आधी ठाकरे गटाच्या बाजूने युक्तिवाद करताना ज्येष्ठ वकील कपिल सिब्बल यांनी विधानसभा अध्यक्ष आणि निवडणूक आयोगाचा निर्णय कसा चुकीचा होता हे कोर्टाला सांगितलं. शिवसेना फुटीमध्ये १० व्या अनुसूचीचे उल्लंघन करण्यात आल्याचा दावाही त्यांनी केला. आता त्यावर शिंदेंच्या वतीने ज्येष्ठ वकील नीरज किशन कौल यांनी प्रतिवाद सुरू केला आहे. एकनाथ शिंदे यांच्या वतीने ज्येष्ठ विधिज्ञ नीरज किशन कौल यांनी पक्षाची १९९९ सालची राज्यघटना कशी अस्तित्वात आली, याबाबत न्यायालयाला माहिती दिली.

------------

### बीडः शिक्षक भरतीप्रकरणी

चौकशी करण्यासाठी शिक्षण उपसंचालक कार्यालयाचे सहाय्यक संचालक सुनील पोलास, अंबाजोगाई येथील जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे जेष्ठ अधिव्याख्याता श्रीकृष्ण देशमुख आणि जालना येथील योजना शिक्षण विभागाचे उपशिक्षणाधिकारी रवी जोशी यांचा चौकशी समितीत सहभाग आहे. सन २०१२ ते २०२३ पर्यंत खाजगी शिक्षण संस्थेत बोगसरित्या भरती झाले आहेत. ज्या शिक्षण संस्थांनी बेकायदेशीर शिक्षक भरती केली आहे, त्यांच्यात मात्र ही समिती आल्यामुळे खळबळ उडाली आहे. सदर चौकशी समिती आल्यामुळे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण विभागातील संबंधिताचे धाबे दणाणले आहेत.

--------------

### खनिज चोरांची आता खैर नाही;

मनीषा जयभाये, रेलटेल कंपनीचे प्रमुख विनोद अग्रवाल आणि कोकण सहआयुक्त रवींद्र पवार उपस्थित होते. 'महाखनिज' प्रणालीच्या माध्यमातून गेल्या पाच वर्षांत राज्य शासनाच्या तिजोरीत सुमारे १६,००० कोटी रुपयांचा महसूल जमा झाला आहे. आता 'महाखनिज २.०' या नवीन व प्रगत आवृत्तीच्या माध्यमातून पुढील पाच वर्षांत २५,००० कोटी रुपयांचे महसूल संकलनाचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

----------------

### जनता दरबार सुरू असतानाच धनंजय मुंडेंची

समस्या जाणून घेण्याचे काम सुरू असतानाच मुंडे यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले. परिस्थिती लक्षात घेऊन त्यांना तातडीने अतिथीगृहाशेजारील रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्यांची प्राथमिक वैद्यकीय तपासणी केली आणि पुढील उपचार सुरू केले. धनंजय मुंडे यांची प्रकृती बिघडल्याची माहिती समोर येताच त्यांच्या समर्थक आणि नागरिकांमध्ये काही काळ चिंतेचे वातावरण निर्माण झाले. मात्र, उपचारानंतर त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती मिळत आहे.

--------------

### राज्यात ८ हजारांहून अधिक

राज्यात दरवर्षी लाखो तरुण पोलीस भरतीसाठी प्रयत्न करतात. त्यामुळे ८,१०० पदांची ही भरती इच्छुक उमेदवारांसाठी महत्त्वाची संधी मानली जात आहे. या भरतीमध्ये राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये रिक्त पदांनुसार भरती केली जाणार आहे. सोलापूर जिल्ह्यात ११७ पोलीस अंमलदारांची पदे भरली जाणार असल्याची माहिती आहे.इतर जिल्ह्यांमध्येही उपलब्ध रिक्त पदांनुसार जागा निश्चित केल्या जाणार आहेत. त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी संबंधित अधिकृत भरती जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर जिल्हानिहाय पदसंख्या आणि पात्रतेची माहिती तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे.भरतीची अधिकृत जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतरच शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा, शारीरिक पात्रता, आरक्षण, अर्ज शुल्क आणि जिल्हानिहाय रिक्त पदांची अंतिम माहिती स्पष्ट होईल. त्यामुळे पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या उमेदवारांनी आतापासूनच लेखी परीक्षा, शारीरिक चाचणी आणि धावण्याच्या सरावावर लक्ष केंद्रित करणे फायदेशीर ठरेल.

----------------

### 'मंत्र्यांच्या घरात रोकड सापडली

न्यायाधीशांचे संरक्षण करण्यासाठी होत्या. मात्र, भारताच्या सरन्यायाधीशांच्या निदर्शनास आणून दिलेल्या गंभीर प्रकरणात कायदेशीर कारवाई रोखण्यासाठी त्यांचा वापर करता येणार नाही, असे त्यांनी नमूद केले. या घटनेची माहिती सरन्यायाधीशांना देण्यात आली होती आणि त्यासंदर्भात व्हिडिओ पुरावाही समोर होता. त्यामुळे न्यायाधीशांवर दबाव आणण्याचा किंवा त्यांना घाबरवण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता, असे साळवे म्हणाले. विशेष म्हणजे ही तक्रार कोणत्याही पक्षकाराने केलेली नव्हती. त्यामुळे अशा परिस्थितीत सरन्यायाधीशांनी ''कायद्याला आपले काम करू द्या'' अशी भूमिका घ्यायला हवी होती, असे त्यांनी ठामपणे सांगितले. न्यायालयीन स्वायत्तता म्हणजे न्यायाधीशांना उत्तरदायित्व किंवा चौकशीपासून संरक्षण देणे नव्हे, असे स्पष्ट करत साळवे यांनी न्यायव्यवस्थेच्या कार्यपद्धतीवरही भाष्य केले. ''संविधानातील ज्या तरतुदी तुम्हाला लोकांच्या आवाक्याबाहेर ठेवतात, त्या न्यायव्यवस्थेला स्वायत्तता देत नाहीत. जळत्या रोकडसह पकडल्या गेलेल्या सहकाऱ्याचा बचाव करणाऱ्या घटनात्मक तरतुदींमुळे स्वायत्तता येत नाही. स्वायत्तता ही स्वतःच्या चरित्रातून निर्माण होते,'' असे ते म्हणाले. या प्रकरणामुळे न्यायव्यवस्थेत प्रभावी जबाबदारी निश्चित करणारी यंत्रणा उभारण्यात अपयश असल्याचे स्पष्ट झाले आहे. अशा घटनांची पुनरावृत्ती झाल्यास न्यायव्यवस्थेवरील जनतेचा विश्वास दुखावला जाऊ शकतो, असा इशाराही त्यांनी दिला. साळवे यांनी न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठीच्या विद्यमान कॉलेजियम प्रणालीवरही प्रश्न उपस्थित केले. जगातील इतर कोणत्याही ठिकाणी न्यायाधीशच न्यायाधीशांची नियुक्ती करत नाहीत, असे सांगत त्यांनी न्यायाधीशांच्या नियुक्तीसाठी अधिक पारदर्शक व्यवस्था आणि उत्तरदायित्व निश्चित करणारी स्वतंत्र संस्थात्मक यंत्रणा असण्याची गरज व्यक्त केली. देशातील न्यायालयांमध्ये प्रलंबित असलेल्या खटल्यांची मोठी संख्या आणि न्यायाधीशांची कमतरता यावरही त्यांनी चिंता व्यक्त केली. न्यायव्यवस्थेसमोरील या प्रश्नांवर केवळ तात्पुरत्या उपायांनी भागणार नसून संपूर्ण प्रणालीचा पुनर्विचार करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. १६ सप्टेंबर २०२६


## थोडक्यात

### चौसाळा येथे जय हिंद गणेश मंडळाच्या श्री गणेशाची उत्साहात स्थापना

चौसाळा । प्रतिनिधी



प्रतिवर्षाप्रमाणे गेल्या ४० वर्षापासून सुरू असलेले जय हिंद गणेश मंडळाच्या गणेश मंडळाच्या श्री गणेशाची स्थापना मोठ्या सावध मिरवणुकीने काढून आनंदमय वातावरणात स्थापना करण्यात आली या श्री गणेश उत्सवानिमित्त्याने यावर्षीची गणेश मंडळाच्या कार्यकारणीची निवड करण्यात आली अध्यक्ष पदावर अशोक बाळासाहेब निनाळे यांची निवड होऊन उपाध्यक्ष म्हणून महेश पोपट पवार यांची निवड झाली तर सचिव म्हणून प्रतीक पोपट. कळसकर यांची निवड झाली कोषाध्यक्ष म्हणून आदित्य रमेश कळसकर यांचे नाव घोषित करण्यात आले प्रति वर्षाप्रमाणे यावर्षी मंडळाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले असून या कार्यक्रमात कीर्तन प्रवचन रक्तदान असे असे कार्यक्रम होऊन पर्यावरणाच्या बाबत व स्वच्छतेबाबत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असे कळते.

### प्रसिद्ध व्यापारी हाजी मुस्ताक तांबोळी यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी



कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती रमजान तांबोळी तसेच कांदा व्यापारी बबलू शेठ तांबोळी यांचे थोरले बंधू हाजी मुस्ताक नूर मोहम्मद तांबोळी यांचे आज, सोमवारी सायंकाळी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने कडा परिसरातील व्यापारी वर्ग व सामाजिक वर्तुळात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर आज मंगळवार १५ सप्टेंबर रोजी सकाळी ८:३० वाजता कडा येथील कब्रस्तान दर्गा परिसरात अंत्यसंस्कार (दफनविधी) करण्यात आले. त्यांच्या पश्चात मोठा परिवार आहे.



### कॅलिग्राफीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना उलगडली संविधानातील जीवनमूल्ये

बीड । प्रतिनिधी

पुकार संस्थेच्या 'संवेदना फेलोशिप' अंतर्गत बाळनाथ माध्यमिक विद्यालय, चाकरवाडी येथे विद्यार्थ्यांसाठी एका अभिनव 'संविधान कॅलिग्राफी कार्यशाळे'चे उत्साहात आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक तथा संवेदना साथी मिथुन जोगदंड यांनी सुंदर अक्षरे आणि बोलक्या चित्रांच्या माध्यमातून मुलांना संविधानातील समानता व बंधुता या मूल्यांची रंजक ओळख करून दिली.

संवेदना सहाय्यक साथी अक्षय आणि प्रवीण यांनी या कार्यशाळेचे नेटके संयोजन व आयोजन केले होते. केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता कलेच्या माध्यमातून दैनंदिन जीवनात संविधानाचे महत्त्व काय आहे, हे विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. याप्रसंगी बोलताना प्रमुख मार्गदर्शक मिथुन जोगदंड यांनी, अक्षरांच्या सुंदर वळणांतून रुजवूया संविधानाची मूल्ये; सजग विचारांतून घडवूया उद्याचे सुजाण नागरिक! हे घोषवाक्य देत विद्यार्थ्यांना प्रेरित केले. त्यांनी दैनंदिन जीवनात दिशा देणारी संविधानातील चार प्रमुख जीवनमूल्ये-स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय .कॅलिग्राफीच्या विविध कलात्मक शैलींतून समजावून सांगितली. त्याचबरोबर बालकांशी संबंधित कायदे आणि त्यांच्या मूलभूत अधिकारांवर सविस्तर प्रकाश टाकला. यामध्ये प्रामुख्याने शिक्षणाचा हक्क, संरक्षणाचा हक्क , स्वतःचे मत व्यक्त करण्याचा हक्क,सन्मानपूर्वक जीवन जगण्याचा हक्क. या चारही हक्कांची माहिती विद्यार्थ्यांना सोप्या आणि प्रभावी भाषेत देण्यात आली. अक्षरांची वळणे आणि चित्रांचे रेखाटन करताना विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.या कार्यशाळेस शाळेचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक वृंद आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कला आणि सामाजिक मूल्यांचा हा संगम विद्यार्थ्यांमध्ये संविधान साक्षरता रुजवण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

# वाघोरा जलजीवन मिशन योजनेत गैरव्यवहार -महादेव मोरे

## ४ कोटी ९१ लाखाच्या कामाची चौकशी करण्याची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

मौजे वाघोरा, ता. माजलगाव, जि. बीड येथे जलजीवन मिशन अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या सुमारे ४ कोटी ९१ लाख रुपयांच्या पाणीपुरवठा योजनेत मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झाल्याचा आरोप ग्रामस्थ महादेव मोरे यांनी केला आहे. याबाबत त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करून योजनेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, केंद्र शासनाच्या जलजीवन मिशन योजनेंतर्गत वाघोरा गावासाठी मोठ्या निधीची तरतूद करण्यात आली असून, संबंधित कामासाठी निधी वितरित करण्यात आला आहे. मात्र, प्रत्यक्ष जमिनीवरील कामाची पाहणी केली असता योजनेचे काम अत्यंत अपूर्ण असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. गावात अद्याप एकही नळ कनेक्शन झालेले नसून अनेक ठिकाणी पाइपलाइनचे कामही करण्यात आलेले नाही. असे असताना काम पूर्ण झाल्याचे दाखवून बिले काढण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तसेच गावातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा, अंगणवाडी केंद्रे तसेच नागरिकांना योजनेचा



अपेक्षित लाभ मिळालेला नसल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. गावापासून गोदावरी नदीचे अंतर कमी असतानाही पाइपलाइन दूरवरून आणण्यात आल्याने कामाचा खर्च वाढवून भविष्यात देखभाल-दुरुस्तीचा अतिरिक्त आर्थिक भार शासनावर पडण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली असून

योजनेतील कामाची तृतीय पक्षामार्फत तांत्रिक चौकशी करण्यात यावी, प्रत्यक्ष कामाची मोजणी करून शासनाच्या निधीचा योग्य वापर झाला आहे का, याची तपासणी करावी व या मध्ये गैरप्रकार आढळल्यास संबंधित अधिकारी, अभियंता व ठेकेदारांवर जबाबदारी निश्चित करून फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, यापूर्वीही संबंधित योजनेबाबत ग्रामस्थांनी तक्रारी करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. मात्र अद्याप ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप तक्रारदारांनी केला आहे. त्यामुळे या प्रकरणाची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने अमरण उपोषण करण्याचा इशारा महादेव मोरे यांनी दिला आहे.

# धुनकवाड येथे अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण व भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा

## भाविक-भक्तांनी लाभ घ्यावा-रत्नाकर यादव,राम यादव व शिवाजी यादव

वडवणी । प्रतिनिधी

धुनकवाड येथे गेल्या ४३ वर्षांपासून सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा यंदाही कायम राहणार असून रविवार दि. २० सप्टेंबर ते शनिवार दि. २६ सप्टेंबर २०२६ दरम्यान अखंड हरिनाम सप्ताह, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, श्रीमद् भागवत कथा व कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या धार्मिक सोहळ्याचा लाभ पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने घ्यावा असे आवाहन आयोजक रत्नाकर भिमराव यादव, राम भिमराव यादव व शिवाजी परमेश्वर यादव यांनी केले आहे.





धुनकवाड हे डोंगरपट्ट्यात धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असणारे गाव म्हणून ओळखले जाते. वै. ह.भ.प. दत्ता महाराज पिंपळनेरकर, ह.भ.प. वै. जनार्दन (आण्णा) यादव, वै. ह.भ.प. रघुनाथ महाराज यादव, वै. गुरुवर्य गंगाधर शास्त्री मुळे व वै. राजेंद्र जाधव यांच्या प्रेरणेने गेल्या ४३ वर्षांपासून येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण तसेच श्रीमद् भागवत कथा ज्ञानयज्ञ सोहळा आयोजित केला जात आहे. विशेष म्हणजे आगामी दहा वर्षांसाठी या सप्ताहाचे यजमानही निश्चित करण्यात आले आहेत.

सप्ताहादरम्यान दररोज पहाटे ४ ते ६ काकडा, सकाळी ६ ते ७ विष्णुसहस्रनाम व गीतेचा १५ वा अध्याय, सकाळी ७ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ११ ते १२.३० गाथा भजन होणार आहे. ह.भ.प. गुरुवर्य वसंत महाराज पिंपळनेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली दुपारी १ ते ५ श्रीमद् भागवत कथा प्रवक्ते ह.भ.प. नवनाथ महाराज फुटाणे आरणवाडीकर यांचे भागवत कथा निरूपण, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ६ ते ८ भोजन, रात्री ९ ते ११ हरिकीर्तन व त्यानंतर सामुदायिक जागर होणार आहे. या सोहळ्यास ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

नामवंत महाराजांची कीर्तनसेवा ९ ते ११ रविवार दि. २० सप्टेंबर रोजी ह.भ.प. महंत आप्पासाहेब महाराज चौरे, सोमवार दि. २१ रोजी ५ते ७ या वेळेत विनोदाचार्य निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर), मंगळवार दि. २२ रोजी ,९ते ११वा. भागवताचार्य ह.भ.प. रोहिदास महाराज कळकेकर, बुधवार दि. २३ रोजी ह.भ.प. विनोदाचार्य सतीश महाराज तांबे, गुरुवार दि. २४ रोजी ह.भ.प. अक्रूर महाराज साखरे, तर शुक्रवार दि. २५ सप्टेंबर रोजी वैराग्यमूर्ती ह.भ.प. रामकृष्ण बापू रंधवे यांचे कीर्तन होणार आहे. शनिवार दि. २६ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत विनोदाचार्य पांडुरंग महाराज उगले यांच्या सुश्राव्य वाणीतून काल्याचे कीर्तन होऊन सप्ताहाची सांगता होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहामुळे धुनकवाड परिसरात सात दिवस भक्तिमय वातावरण निर्माण होणार असून पंचक्रोशीतील भाविकांनी ज्ञानेश्वरी पारायण, भागवत कथा व कीर्तन महोत्सवाचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजक रत्नाकर भिमराव यादव, राम भिमराव यादव व शिवाजी परमेश्वर यादव यांच्यासह समस्त गावकरी मंडळी धुनकवाड यांनी केले आहे.

## पान ६ वरून...

### दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण

करून शेतकऱ्यांना हेक्टरी साठ हजार रुपयाची आर्थिक मदत देण्यात यावी,चालू वर्षातील २०२६ चा पिक विमा अग्रीम हप्ता तात्काळ शेतकऱ्यांना देण्यात यावा, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनला असून जनावरांसाठी तात्काळ छावण्या सुरू करण्यात याव्यात तसेच शेतमजुरांना तात्काळ रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करावेत या या मागणीचे निवेदन उपजिल्हाधिकारी कार्यालय आंबेजोगाई, तहसील कार्यालय आंबेजोगाई व बर्दापूर पोलीस स्टेशन यांना या मागणीचे निवेदन देण्यात आले आहे या मागण्यांसाठी उद्या दिनांक १६ सप्टेंबर बुधवार रोजी सकाळी ठीक दहा वाजता लातूर आंबेजोगाई महामार्गावरील बर्दापूर फाटा येथे हे आंदोलन करण्यात येणार आहे या आंदोलनात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### शासकीय खरेदी केंद्रावर

आधार कार्ड, आधार लिंक असलेला मोबाईल क्रमांक व ई-पीक पाहणीची नोंद आदी आवश्यक माहिती उपलब्ध ठेवावी. उउखच्या सूचनेनुसार शेतकऱ्यांना नोंदणी व खरेदीसंदर्भातील माहिती मिळण्यासाठी ७४९९३९६६२४ या व्हॉट्सप हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधता येणार आहे. शेतकऱ्यांनी निर्धारित कालावधीत 'कपास किसान' पवर नोंदणी करून शासकीय चडझ खरेदी योजनेचा अधिकाधिक लाभ घ्यावा, असे आवाहन सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे, सचिव हरिभाऊ सवणे यांचेसह सर्व सन्माननीय संचालक मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

### सार्वजनिक कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांत

स्थापना संस्थेचे सीए गिरीष गिलडा यांच्या हस्ते आणि संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या प्रमुख उपस्थितीत विधिवत पार पडली. या प्रसंगी सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते. गणेशोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी गणेशोत्सव अध्यक्ष अभिजीत बोदर, उपाध्यक्ष महेश भराडे आणि आदित्य शिरसाट यांनी सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थी व प्राध्यापकांच्या सहकार्याने उत्तम नियोजन केले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देत सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक उपक्रमांद्वारे हा उत्सव साजरा करण्याचा संस्थेचा मानस आहे. या एकत्रित आयोजनामुळे कॅम्पस परिसरात सध्या भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे.

**मिरवणुकीत विद्यार्थ्यांचा उत्साह**

यंदाच्या गणेशोत्सवाचे यजमानपद आदित्य कृषी व संलग्न महाविद्यालयांकडे आहे. विद्यार्थ्यांनी कल्पकता आणि कलागुणांचा वापर करून आकर्षक देखावा साकारला. ढोल-ताशांच्या गजरात व पारंपरिक वातावरणात काढण्यात आलेल्या मिरवणुकीत विद्यार्थी, प्राध्यापक, प्राचार्य आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

### दुष्काळ व पीकविम्यासाठी

पीकविमा तातडीने मंजूर करून शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावा, अशा विविध मागण्या शेतकरी हक्क मोर्चाच्या वतीने करण्यात आल्या आहेत. आंदोलनाच्या जनजागृतीसाठी शेतकरी हक्क मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील नाळवंडी, लिंबागणेश, राक्षसभुवन, कुक्कडगाव, पिंपळगाव मांजरा, माळसापूर, एकनाथवाडी, उमरी, उमरत खालचा, नागापूर खुर्द, नागापूर बुद्रुक, बराणपूर, भाटसांगवी, कुर्लादगाव, माळापुरी, कामखेडा, बकरवाडी, घाटसावळी, कोल्हारवाडी, समनापूर, मोची पिंपळगाव, पाली, नेकनूर, मंजरी फाटा, पिंपळनेर आदी सुमारे ३० ते ३५ गावांत बैठका घेऊन शेतकऱ्यांमध्ये जनजागृती केली. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी होणाऱ्या या आंदोलनात जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शेतकरी हक्क मोर्चाच्या पदाधिकाऱ्यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी शेतकरी हक्क मोर्चाचे शेतकरी पुत्र राजेंद्र आमटे, डॉ. गणेश ढवळे, ज्ञानेश्वर राऊत, रामधन जमाले, बाळासाहेब मोरे, कुलदीप करपे, राजू गायके, सादिक पठाण, हनुमान घोडके, अर्जुन सोनवणे यांच्यासह मोर्चाचे पदाधिकारी उपस्थित होते.

**गावागावातून हलगीचा आवाज जिल्हाधिकारी कार्यालयावर घुमणार!**

शेतकऱ्यांच्या ज्वलंत प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी गावागावातील शेतकरी हलगी (डफडे) वाजवत जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दाखल होणार आहेत. दुष्काळ जाहीर करा, नुकसानभरपाई द्या आणि प्रलंबित पीकविमा तात्काळ जमा करा, असा आवाज या आंदोलनातून शासनाच्या कानावर घातला जाणार आहे.

### स्वतःतील टॅलेंट ओळखा

डॉ. भाऊसाहेब राठोड उपस्थित होते. व्याख्यानमालाच पाहिले पुष्प गुंफताना उद्घाटक संदीप जगताप पुढे म्हणाले की, जगासमोरील प्रश्न बदलले आहेत; मात्र आपण उत्साहाचा अभाव, दैववाद आणि पारंपरिक विचारांच्या चौकटीत अडकून पडत आहोत. त्यातून बाहेर पडण्यासाठी सृजनशील विचार आणि नवे मार्ग शोधण्याची गरज आहे.

नोकरी ही आयुष्यातील एक संधी असली, तरी केवळ नोकरीच्या मागे लागण्यापेक्षा स्वतःच्या क्षमता आणि उपलब्ध संधी ओळखणे महत्त्वाचे आहे. शेती ही पिढ्यान्पिढ्या चालत आलेली शाश्वत व्यवस्था आहे. असे सांगितले. अध्यक्षीय भाषणात ड. बी. आर. डक म्हणाले की, स्वातंत्र्यपूर्व काळातील पिढीने संघर्ष केला म्हणून आज आपण स्वतंत्र आहोत. त्यामुळे आजच्या पिढीने आपली जबाबदारी ओळखून समाज आणि राष्ट्राच्या विकासासाठी योगदान दिले पाहिजे. सुंदरराव सोळंके साहेब हे काळाच्या पुढे विचार करणारे आणि दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी परिसराच्या विकासासाठी नवे मार्ग शोधले. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी आजच्या पिढीनेही नवनिर्मितीचा ध्यास घेत नवे मार्ग शोधावेत असे आवाहन केले. या प्रसंगी प्राचार्य डॉ. अभय सोळुंके यांनी समयोचित मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भाऊसाहेब राठोड यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. बापूराव वऱ्हाडे यांनी केले तर आभार डॉ. एम. ए. कव्हळे यांनी मानले. व्याख्यानमालेस महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकरी प्रचंड संकटात! हेक्टरी एक लक्ष रु.ची मदत तात्काळ द्या, सरकारला बीड शहर बचाव मंचाची मागणी

बीड । प्रतिनिधी

पावसाने पूर्णतः पाठ फिरवल्यामुळे बीड जिल्ह्यासह मराठवाड्यातील शेतकरी प्रचंड संकटात सापडलेला आहे. संपूर्ण मराठवाड्यात तात्काळ दुष्काळ जाहीर करून बळीराजाला हेक्टरी एक लाख रुपयांची मदत तातडीने करण्यात यावी याबाबत बीड शहर बचाव मंच या सामाजिक संघटनेच्या वतीने शासनाला निवेदन सादर करण्यात आले आहे. काल अक्षरशः बळीराजांनी पावसाअभावी निर्माण झालेल्या निरुत्साही परिस्थितीत पोटाला चिमटा काढून कृतज्ञतेने बैलपोळा सर्वत्र साजरा केल्याचे आपणास पहावयास मिळाले . निसर्गाने मागील वर्षी अतिवृष्टीचा मारा करून बळीराजाला संकटात टाकले होते. चालू वर्षी वरून राजाने पूर्णतः पाठ फिरवून वक्रदृष्टी करून मराठवाड्यासह संपूर्ण बीड जिल्ह्यातील बळीराजाला अक्षरशः मेटाकुटीला आणलेले असून अगोदरच कर्जाच्या खाईत सापडलेल्या बळीराजाची खरीप हंगामाची सर्वच पिके हातची गेलेली आहेत.




आज बळीराजा प्रचंड आर्थिक संकटात सापडलेला असून खऱ्या अर्थाने त्याला तातडीने आर्थिक मदतीचा आधार देणे अत्यंत गरजेचे झालेले आहे. महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करून प्रत्येक बळीराजाला हेक्टरी एक लाख रुपयाची तातडीची मदत करणे अत्यंत गरजेचे आहे. त्याचबरोबर आता बळीराजाला गुरांच्या चाऱ्या पाण्याची दुसरी मोठी चिंता सतावू लागलेली आहे. या निर्माण झालेल्या परिस्थितीमध्ये भीषण पाणी टंचाईचा प्रश्न डोक वर काढत आहे. त्या अनुषंगाने गुरांच्या छावण्या चालू करण्यासाठी योग्य ती पावले उचलणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. चालू वर्षी पावसाळा संपत आला तरी पाऊसच झालेला नसल्याने व पाऊस पडत नसल्यामुळे बळीराजाला चहाचा कप पितानाही अनेक वेळा विचार करायची वेळ आली आहे, बळीराजा चहा सुद्धा अनेकवार विचार करून पीत आहे . आता शेतकरी चहूबाजूंनी संकटांच्या खोल दरीत सापडलेला आहे. देशाचा व करोडोंचा पोशिंदा आभाळाकडं एक टक लावून पावसाची वाट पाहत आहे. बेंबीच्या देठापासून पावसाला आर्त हाक मारत आहे. परंतु निसर्गाला काही मायेचा पाझर फुटताना दिसत नाही व निसर्ग काही बळीराजाच्या मदतीला येताना दिसत नाही . पाऊस पडण्याची वेळ निघून चाललेली आहे. त्यामुळे शासनाने आता बळीराजाचे दुःख पाहून व समजून घेऊन त्याला भरीव मदत करणे अत्यंत गरजेचे आहे. आपला सर्वांचा पोशिंदाच उपाशी राहत आहे हे शासनाच्या लक्षात का येत नाही ? हा प्रश्नही उपस्थित झाला आहे. बळीराजाच्या आत्महत्या होऊ नयेत व पशुधनाची जीवितहानी होऊ नये यासाठी शासनाने ठोस पावले उचलून बळीराजाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची वेळ आलेली आहे. तसेच शासनाने ठोस पावले उचलून बळीराजाला हेक्टरी एक लाख रुपयाची मदत तातडीने द्यावी तसेच गुरांच्या चाऱ्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी तातडीने छावण्या उभ्या करण्यासाठी पावले उचलावीत अशी मागणी बीड शहर बचाव मंचाच्या वतीने करण्यात येत आहे. शासनाने बळीराजाला वाचवण्यासाठी तात्काळ उपाययोजना कराव्यात ही नम्र विनंती या निमित्ताने करण्यात येत आहे. सदर निवेदन बीड जिल्हाधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आलेले आहे. तसेच सदर निवेदन प्रत्यक्ष सादर करण्यासाठी मुख्यमंत्री साहेब यांच्याकडे बीड शहर बचाव मंचाचे डव्होकेट प्रतिनिधी रवाना झालेले आहेत. हे निवेदन सादर करताना बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीन जायभाये, कायदेशीर सल्लागार ड. अनिल बारगजे,

डॉ. संजय तांदळे आदी पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

### जाहीर प्रगटन

मा. श्री एम. ए. शिंदे, दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात.

किरकोळ दिवाणी अर्ज ३३९/२०२६ इंदुबाई व इतर विरुध्द निरंक मार्फत ॲड. एस. आर. नागरगोजे

अर्जदार १. इंदुबाई भ्र. आनंदराव उर्फ आनंदा राऊत, वय ७८ वर्षे, धंदा घरकाम, २. दत्तात्रय पि. आनंदराव उर्फ आनंदा राऊत, वय ४० वर्षे, धंदा शेती, ३. वासुदेव पि. आनंदराव उर्फ आनंदा राऊत, वय ३७ वर्षे, धंदा शेती, ४. उषा पि. आनंदराव उर्फ आनंदा राऊत, वय ४९ वर्षे, धंदा नौकरी, ५. गंगा भ्र. दत्तात्रय बारवेकर, वय ३८ वर्षे, धंदा घरकाम, अर्जदार क्र. १ ते ४ रा. चिखली नाथ ता. पाटोदा जि. बीड,

अर्जदार क्र.५ रा. उंबरे ता. राहुरी जि. अ.नगर,

विरूध्द निरंक

**मागणी अर्जः- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

वरील अर्जदार क्र.१ ते ५ यांनी या न्यायालयात मयत आनंदराव उर्फ आनंदा पि. केशव राऊत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी आनंदराव उर्फ आनंदा पि. केशव राऊत यांचा मृत्यु दिनांक १०/०५/२०२६ रोजी चिखली ता. पाटोदा जि. बीड येथे झाला असुन अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असून अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. तसेच अर्जदार क. ४ व ५ या मयताच्या मुली आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरह अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत आनंदराव उर्फ आनंदा पि. केशव राऊत यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०८ सप्टेंबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १६ ऑक्टोबर २०२६.

**क. लिपीक**

**आदेशावरुन,**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय, क. स्तर, पाटोदा,**
**ता. पाटोदा, जि. बीड.**

# शिवगर्जना व सह्यगिरीच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप

युसूफवडगांव । प्रतिनिधी

आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडथळा निर्माण होऊ नये, तसेच गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात कायम ठेवण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील शिवगर्जना फाऊंडेशन व सह्यगिरी विचार मंचच्या वतीने युसूफवडगांव परिसरातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हात देण्यात आला. युसूफवडगांव येथील जिल्हा परिषद शाळा, शिंदेवाडी जिल्हा परिषद शाळा तसेच युसूफवडगांव हायस्कूलमधील गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.



युसूफवडगांवचे भूमिपुत्र तसेच गेल्या १७ वर्षांपासून कोल्हापूर जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळेत सहशिक्षक म्हणून कार्यरत असलेले आदर्श शिक्षक अमोल जोगदंड हे शिवगर्जना फाऊंडेशनचे कार्याध्यक्ष व सह्यगिरी विचार मंचचे संचालक आहेत. शिक्षण क्षेत्रात काम करत असताना त्यांनी आपल्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून गोरगरीब, अनाथ व गरजू विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम सातत्याने राबविले आहेत.

विद्यार्थ्यांना शालेय साहित्य उपलब्ध करून देण्याबरोबरच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिरे, विविध शैक्षणिक व बौद्धिक स्पर्धांचे आयोजन, विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी करून घेणे तसेच गरजू विद्यार्थ्यांना सायकलींचे वाटप अशा विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याचे काम या संस्थांच्या वतीने केले जात आहे. आर्थिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणात खंड पडू नये, यासाठी संस्थेच्या माध्यमातून सातत्याने मदतीचा हात दिला जात आहे.

कोल्हापूर जिल्ह्यात शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असताना आपल्या मायभूमीशी असलेली नाळ जपत अमोल जोगदंड यांनी युसूफवडगांव व परिसरातील विद्यार्थ्यांनाही या उपक्रमाचा लाभ मिळावा, यासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. गावातील व परिसरातील गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य मिळावे आणि ते शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात टिकून राहावेत, या उद्देशाने ते गावाला आल्यानंतर सातत्याने विविध स्वरूपाची मदत करत असतात.

याच उपक्रमाचा एक भाग म्हणून युसूफवडगांव व शिंदेवाडी येथील जिल्हा परिषद शाळा तसेच युसूफवडगांव हायस्कूलमधील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.'शिक्षण हीच खरी ताकद असून आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये' या भावनेतून सुरू असलेल्या या उपक्रमाचे पालक, शिक्षक व ग्रामस्थांकडून कौतुक करण्यात आले. यावेळी केंद्रप्रमुख अर्जुन बोराडे, प्राचार्य अंकुश भोसले, मुख्याध्यापक शंकर मुळे, पर्यवेक्षक शेख, सहशिक्षक बत्तास मुकदम, बसलिंग गडकर, राजाभाऊ शिंदे, अनंत तरसकसबंद, खराडे आबा, ओमकार लामतुरे, जयराज निशिगंध, सुमेध उजगरे यांच्यासह शिक्षकवृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# पावसाअभावी बळीराजा मोठ्या संकटात

## राज्य सरकारकडून परिस्थितीचा आढावा, सहकार मंत्री बाबासाहेब पाटलांचा शेतकऱ्यांना शब्दड

**मुंबई । प्रतिनिधी**

**पावसाच्या अभावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर सरकार निर्णय घेईल. विकासात्मक कामे काही काळ बाजूला ठेवून शेतकरी आणि शेतमजुरांचा नक्कीच विचार केला जाईल, असा विश्वास राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी व्यक्त केला आहे. राज्यात पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. सोयाबीन, कापूस, मूग, उडीद आणि तूर यांसारखी खरीप पिके संकटात सापडली आहेत. पाऊस नसल्यामुळे उसाची वाढही अपेक्षेप्रमाणे होताना दिसत नाही. त्यातच ऊस लागवडीची स्थिती राज्यातील अनेक भागांत चिंताजनक बनली आहे.**



गेल्या तीन महिन्यांपासून अनेक ठिकाणी ढगाळ वातावरण आणि अधूनमधून होणाऱ्या रिमझिम पावसाचीच परिस्थिती आहे. त्यामुळे खरीप हंगाम हातचा जाण्याची शक्यता निर्माण झाली असून, आगामी रब्बी हंगामही आशादायक दिसत नाही. पावसाअभावी भविष्यात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता यांसारख्या समस्या गंभीर होण्याची शक्यता आहे. प्रकल्पांमध्ये असलेला अत्यल्प पाणीसाठा आणि कोरडे पडलेले नदीपात्र पुढील संकटाची चाहूल देत आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्य सरकारने परिस्थितीचा अहवाल मागवला आहे. या अहवालावर उद्या होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, याबाबत सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितले की, त्यांनी लातूर जिल्ह्यातील अनेक भागांना भेटी दिल्या असून परिस्थिती चिंताजनक आहे. सरकार या सर्व परिस्थितीचा गांभीर्याने विचार करत आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत यावर चर्चा होणे अपेक्षित असून, गरज भासल्यास काही विकासात्मक कामे बाजूला ठेवून सर्वसामान्य शेतकरी आणि शेतमजुरांच्या हिताचा नक्कीच विचार केला जाईल.

# कमवा लाखोंचे उत्पन्न: जाणून घ्या सुपारी लागवडीची संपूर्ण माहिती



**सुपारी हे महाराष्ट्रातील कोकण भाग आणि किनारपट्टीच्या भागात घेतले जाणारे प्रमुख नगदी पीक आहे. योग्य नियोजन आणि व्यवस्थापनाने सुपारीच्या शेतीतून दीर्घकाळ उत्तम उत्पादन मिळते.**

**जमीन** : पाण्याचा उत्तम निचरा होणारी, खोल आणि सुपीक तांबडी किंवा गाळाची जमीन सर्वोत्तम. जमिनीचा सामू () ५.५ ते ६.५ असावा.

**प्रमुख सुधारित जाती** : श्रीवर्धनी: कोकण भागात अत्यंत लोकप्रिय; फळे मोठी, गोल आणि चविष्ट असतात. मोहितनगर: अधिक उत्पादन देणारी जात; फळांचा आकार मोठा असतो. मंगला आणि सुमंगला: लवकर फलोत्पादनात येणाऱ्या आणि भरघोस उत्पादन देणाऱ्या जाती. दामंगला: कीड व रोगांस प्रतिकारक मानली जाणारी जात.

**लागवडीची पद्धत आणि अंतर** : रोपांमधील अंतर: २.७ मीटर २.७ मीटर (९ फूट ९ फूट) अंतरावर लागवड करावी. खड्ड्यांचा आकार: ९० सेमी ९० सेमी ९० सेमी (३ ३ ३ फूट) आकाराचे खड्डे खणावेत. खड्डे भरणे: खड्ड्यांमध्ये ५०% चांगले मातीचे मिश्रण, ५ ते १० किलो चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट, आणि १ किलो सिंगल सुपर फॉस्फेट मिसळून भरावे.

**खत आणि पाणी व्यवस्थापन** : पाणी व्यवस्थापन:

उन्हाळ्यात ४ ते ६ दिवसांच्या अंतराने, तर हिवाळ्यात ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी द्यावे. ठिबक सिंचन पद्धतीचा वापर केल्यास पाण्याची बचत होते आणि झाडांची वाढ चांगली होते.

**खत मात्रा (प्रति झाड दरवर्षी)** :

शेणखत: १० ते १५ किलो. रासायनिक खते: १०० ग्रॅम नत्र (), ४० ग्रॅम स्फुरद , आणि १४० ग्रॅम पालाश दोन समान हप्त्यांत (सप्टेंबर आणि फेब्रुवारी) द्यावे.

**आंतरपिके** :

सुपारीच्या बागेत पहिल्या ४-५ वर्षांत जागा मोकळी असल्याने खालील आंतरपिके घेऊन अतिरिक्त उत्पन्न मिळवता येते. काळी मिरी (सुपारीच्या झाडावर वेली चढवून). केळी, अननस, कोको, जायफळ आणि हळद/आले.

**कीड व रोग नियंत्रण** :

कोल्हा रोग : पावसाळ्यात फळे सडतात. उपाय: पावसाळा सुरू होण्यापूर्वी बागेवर १% बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी. बांधा / मूळ कुजणे: पाण्याचा निचरा नीट न झाल्यास हा रोग होतो. उपाय: बागेत पाणी साचू देऊ नये आणि ट्रायकोडेर्मा चा वापर करावा.

**काढणी आणि उत्पादन** :

काढणी: लागवडीनंतर सुमारे ५ ते ६ वर्षांनी सुपारीच्या झाडाला फळे येण्यास सुरुवात होते. फळे पूर्ण पिकल्यावर (पिवळी-नारंगी झाल्यावर) काढणी केली जाते. उत्पादन: एका पूर्ण वाढलेल्या निरोगी झाडापासून वर्षाला सुमारे २ ते ३ किलो वाळलेली सुपारी (सुपारीचे गोटे) मिळते.

# योग्य नियोजन आणि अचूक पद्धत अशी करा बटाट्याची लागवड अन्



घरच्या घरी किंवा शेतात बटाट्याची लागवड करणे अतिशय सोपे आहे. बटाटा हे जमिनीखाली येणारे पीक असल्याने त्यासाठी मातीची निवड आणि योग्य पद्धत वापरणे खूप महत्त्वाचे असते. बटाट्याची भरपूर आणि दर्जेदार मोठी कापणी मिळवण्यासाठी खालील स्टेप्स फॉलो करा:

**योग्य हंगाम** : बटाटा हे थंड हवामानात येणारे पीक आहे. त्यामुळे भारतात याची लागवड प्रामुख्याने ऑक्टोबर ते नोव्हेंबर या हिवाळ्याच्या सुरुवातीला केली जाते.

**बटाट्याचे बेणे (बियाणे) तयार करणे** : लागवडीसाठी बाजारातून रासायनिक प्रक्रिया न केलेले, मध्यम आकाराचे बटाटे निवडा. ज्या बटाट्यांना 'डोळे' म्हणजेच छोटे कोंब आलेले आहेत, ते लागवडीसाठी उत्तम मानले जातात. जर बटाटा मोठा असेल, तर त्याचे अशे तुकडे करा की प्रत्येक तुकड्यावर किमान १ ते २ कोंब असतील. तुकडे केल्यानंतर ते १-२ दिवस सावलीत सुकवून घ्या, जेणेकरून त्यांना बुरशी लागणार नाही.

**मातीची तयारी** : बटाट्यासाठी भुसभुशीत, पाण्याचा उत्तम निचरा होणारी आणि सुपीक माती आवश्यक असते. माती घट्ट असेल तर बटाट्याचा आकार मोठा होत नाही. मातीमध्ये भरपूर प्रमाणात शेणखत, गांडूळ खत आणि कोकोपीट मिक्स करा. यामुळे माती मऊ राहते. जर तुम्ही कुंडीत किंवा ग्रो-बॅगमध्ये लावणार असाल, तर किमान १२ ते १५ इंच खोल कुंडी निवडा.

**लागवडीची पद्धत** : अंतर: शेतात लागवड करताना दोन ओळींमध्ये २ फूट आणि दोन बटाट्यांमध्ये ७ ते ९ इंचाचे अंतर ठेवावे. खोली: मातीमध्ये सुमारे ३ ते ४ इंच खोल खड्डा किंवा सरी करा. बटाट्याचा कोंब आलेला भाग वरच्या बाजूला राहील अशा पद्धतीने बटाटा मातीत ठेवा आणि वरून मातीने झाकून टाका.

**पाणी आणि सूर्यप्रकाश** : सूर्यप्रकाश: बटाट्याच्या रोपांना दररोज किमान ६ ते ८ तास भरपूर सूर्यप्रकाश मिळणे गरजेचे आहे. पाणी: लागवड केल्यावर लगेच हलके पाणी द्या. मातीत फक्त ओलावा असावा, दलदल करू नका. जास्त पाण्यामुळे बटाटे जमिनीतच सडू शकतात. माती सुकलेली दिसली कीच पाणी द्या.

**रोपांची काळजी** : लागवडीनंतर साधारण १० ते १५ दिवसांत कोंब मातीच्या वर येतात. मातीची भर देणे (महत्त्वाचा टप्पा): रोपे जशी ५-६ इंच मोठी होतील, तशी त्यांच्या मुळाशी बाजूची माती आणून ढीग करा (वरंबा तयार करा). बटाटे उघडे राहून सूर्यप्रकाश पडल्यास ते हिरवे पडतात आणि विषारी होतात. त्यामुळे बटाटे नेहमी मातीने झाकलेले असावेत.

**काढणी** : लागवडीनंतर साधारण ९० ते १२० दिवसांत (३ ते ४ महिन्यांत) बटाटे काढणीस तयार होतात. जेव्हा बटाट्याची झाडे पिवळी पडून सुकू लागतात, तेव्हा समजून जावे की बटाटे तयार आहेत. झाड सुकल्यानंतर पाणी देणे बंद करा आणि आठवड्याभराने हलक्या हाताने माती खणून बटाटे बाहेर काढा.

# सोन्यापेक्षाही महागडी कोंबडी!



## एका अंड्याची किंमत ३ हजार

जगभरात पोल्ट्री फार्मिंगच्या व्यवसायात कोंबड्यांची किंमत साधारण काही शे रुपयांमध्ये असते. मात्र, जगात एक अशीही कोंबडीची जात आहे, जिच्या एका जोडीच्या किमतीत तुम्ही तोळाभर सोनं खरेदी करू शकता. इंडोनेशियातील 'आयाम सेमानी' हे दुर्मीळ ब्रीड सध्या जगभरात चर्चेचा विषय ठरत आहे. या कोंबडीचे अनोखे रूप आणि तिच्याशी संबंधित खास गोष्टींमुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तिला सोन्यासारखा भाव मिळतो.

**पूर्णपणे काळा रंग हीच ओळख:**

आयाम सेमानी कोंबडीला जगातील इतर सर्व कोंबड्यांपेक्षा वेगळे बनवतो तो म्हणजे तिचा गडद काळा रंग. वरपासून खालपर्यंत ही कोंबडी पूर्णपणे काळी असते. केवळ तिचे पंख, कलगी, चोंच, पाय आणि नखेच नाही, तर तिची जीभ, तोंडाच्या आतील भाग, हाडे आणि मांस देखील पूर्णपणे काळे असते. जेनेटिक्सच्या भाषेत या दुर्मीळ शारीरिक बनावटीला 'फायब्रोमेलानोसिस' असे म्हणतात.

**लाख ते ६ लाखांपर्यंत किंमत** :

या कोंबडीच्या किमतीचा विचार केला तर आंतरराष्ट्रीय बाजारात एका आयाम सेमानी कोंबडीची किंमत सुमारे २ लाख ते ६ लाख रुपयांपर्यंत असते. तिच्या लहानशा पिल्लाची सुरुवातीची किंमतच २० ते २५ हजार रुपयांपेक्षा जास्त असते.

**अंड्याचा रंग कसा असतो आणि किंमत किती?**

अनेक लोकांना असे वाटते की ही कोंबडी काळी आहे, तर तिचे अंडेही काळेच असेल. मात्र तसे नसून तिचे अंडे हलक्या क्रीम किंवा गुलाबी रंगाचे असते. एका अंड्याची किंमत: १५०० ते ३००० रुपये. वेटिंग लिस्ट: हे अंडे खरेदी करण्यासाठी लोक महिना-महिने वेटिंग लिस्टमध्ये असतात.

**इतकी महागडी अंडी का असतात?**

अंड्यांच्या इतक्या जास्त किमतीमागे तिचे मंद गतीने होणारे उत्पादन चक्र आहे. सामान्य हायब्रिड कोंबडी वर्षाला २५० ते ३०० अंडी देते, तर आयाम सेमानी कोंबडी वर्षभरात जेमतेम ६० ते ८० अंडीच देऊ शकते. २०-२५ अंडी दिल्यानंतर ती काही महिन्यांसाठी अंडी देणे पूर्णपणे बंद करते. कमी पुरवठा आणि प्रचंड मागणी यामुळे तिची अंडी महाग असतात.

**धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व:**

इंडोनेशिया आणि जावा बेटावरील स्थानिक लोकांच्या मते या कोंबडीमध्ये दैवी शक्ती असतात आणि ती घराला वाईट नजरेपासून वाचवते. तेथील श्रीमंत लोक हिला नशीब, संपत्ती आणि पॉवरचे प्रतीक मानून आपल्या फार्महाऊसवर पाळतात.

**कडकनाथपेक्षाही दुर्मीळ** :

भारतात मध्य प्रदेशातील 'कडकनाथ' हा कोंबडा काळा असतो, पण आयाम सेमानी त्याच्या तुलनेत खूपच दुर्मीळ आहे. कडकनाथचे मांस ८०० ते १००० रुपये किलोने मिळते, तर आयाम सेमानीचे मांस लाखांच्या घरात विकले जाते. युरोप आणि अमेरिकेतील मोठे शेफ याला जगातील सर्वात लक्झरी आणि रेअर मीट मानतात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६२० : 'मेफ्लॉवर' जहाजाने साउदॅम्पटन बंदरातुन उत्तर अमेरिकेकडे प्रयाण केले.
१८२१ : मैक्सिकोच्या स्वातंत्रतेला मान्यता देण्यात आली होती.
१८६१ : ब्रिटन देशांतील पोस्ट ऑफिस मध्ये बचत खाता उघडण्यास सुरुवात झाली.
१९०८ : 'जनरल मोटर्स कॉर्पोरेशन' या कंपनीची स्थापना झाली.
१९३५ : इंडियन कंपनीज अ‍ॅक्ट अन्वये 'बँक ऑफ महाराष्ट्र'ची नोंदणी करण्यात आली.
१९४५ : दुसरे महायुद्ध हाँगकाँगमधील जपानी सैन्याने रॉयल नेव्हीसमोर शरणागती पत्करली
१९६३ : झेरॉक्स ९१४ या प्रतिमुद्रक यंत्राचे पहिले प्रात्यक्षिक.
१९६७ : सोव्हियत संघाने पूर्व कजाख मध्ये आण्विक चाचणी केली.
१९७५ : पापुआ न्यू गिनी या देशाला (ऑस्ट्रेलियापासुन) स्वातंत्र्य मिळाले.
१९८७ : ओझोनच्या थराच्या कमीत कमी संरक्षण करण्यासाठी मॉन्ट्रियल प्रोटोकॉलवर स्वाक्षरी केली आहे.
१९९७ : आय. टी. सी. आंतरराष्ट्रीय मैदानी स्पर्धेत राजीव बालकृष्णन याने शंभर मीटर धावण्याच्या शर्यतीत १०.५० सेकंद वेळ नोंदवून राष्ट्रीय विक्रम केला.
१९९७ : संस्कृत भाषेसंदर्भात प्रशंसनीय कार्य केल्याबद्दल मुंबई येथील मराठा मंदिर संस्थेच्या वरळी हायस्कूलमधील संस्कृतचे निवृत्त शिक्षक पं. गुलाम दस्तगीर अब्बासअली बिराजदार यांना 'राष्ट्रीय संस्कृत पंडित' हा राष्ट्रपतींकडून दिला जाणारा पुरस्कार जाहीर
२००८ : भारतीय हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड (भेल) च्या कर्मचाऱ्यांना विश्वकर्मा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१३८० : चार्ल्स (सहावा) फ्रान्सचा राजा (मृत्यू: २१ आक्टोबर १४२२)
१३८६ : हेन्री (पाचवा) इंग्लंडचा राजा (मृत्यू: ३१ ऑगस्ट १४२२)
१८५३ : नोबेल पारितोषिक विजेते जर्मन डॉक्टर आल्ब्रेख्त कॉसेल यांचा जन्म.
१८८८ : बेंटले मोटर्स लिमिटेड चे डब्ल्यू ओ. बेंटले यांचा जन्म. (मृत्यू: १३ ऑगस्ट १९७१)
१९०७ : वामनराव सडोलीकर भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या जयपूर-अत्रोली घराण्यातील प्रसिद्ध शास्त्रीय गायक (मृत्यू: २५ मार्च १९९१)
१९१३ : कमलाबाई कृष्णाजी ओगले 'रुचिरा' या पाकशास्त्रावरील प्रचंड खपाच्या पुस्तकाच्या लेखिका (मृत्यू: २० एप्रिल १९९९)
१९१६ : एम. एस. सुब्बुलक्ष्मी भारतरत्न, पद्मभूषण, पद्म विभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय शास्त्रीय कर्नाटकी गायक (मृत्यू: ११ डिसेंबर २००४)
१९२३ : सिंगापूरचे पहिले पंतप्रधान ली कुआन यी यांचा जन्म. (मृत्यू: २३ मार्च २०१५)
१९२५ : आयर्लंडचे पंतप्रधान चार्ल्स हॉगे यांचा जन्म.
१९३१ : भारतीय क्रिकेट पंच आर. रामचंद्र राव यांचा जन्मदिन.
१९४२ : नामदेव धोंडो तथा 'ना. धों' महानोर निसर्ग कवी व प्रयोगशील शेतकरी, त्यांना 'पानझड' या कवितासंग्रहासाठी साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे. १९ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.
१९५४ : संजय बंदोपाध्याय भारतातील बंगाली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतातील प्रख्यात सितार वादक
१९५६ : डेव्हिड कॉपरफिल्ड अमेरिकन जादूगार
१९७१ : भारतीय हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध गीतकार, पटकथा लेखक व कवी प्रसून जोशी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६८१ : मुघल शासक दारा शिकोह आणि सम्राट औरंगजेब यांची मोठी बहीण जहाँनारा बेग़म यांचे निधन.
१७३६ : डॅनियल फॅरनहाइट जर्मन शास्त्रज्ञ (जन्म: २४ मे १६८६)
१८२४ : लुई (अठरावा) फ्रान्सचा राजा (जन्म: १७ नोव्हेंबर १७५५)
१९३२ : सर रोनाल्ड रॉस हिवतापाच्या जंतुंचा शोध लावल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे (१९०२) ब्रिटिश डॉक्टर (जन्म: १३ मे १८५७ आल्मोडा, उत्तराखंड)
१९४४ : भारतीय अभियंता व काशी हिंदू महाविद्यालयाचे माजी उप कुलगुरू ज्वालाप्रसाद यांचे निधन.
१९६५ : फ्रेड क्मिम्बी अमेरिकन ॲनिमेशनपट निर्माते (जन्म: ३१ जुलै १८८६)
१९६५ : परमवीर चक्र पुरस्कार विजेता भारतीय सैन्य अधिकारी लेफ्टनंट कर्नल ए.बी. तारापोर यांचे निधन.
१९७३ : पुण्यातील जुन्या पिढीतील सरदार, पर्वती संस्थानचे विश्वस्त, संगीतज्ञ, इतिहासाचे अभ्यासक गंगाधरराव नारायणराव तथा आबासाहेब मुजुमदार यांचे निधन. त्यांचे मूळ नाव श्रीधर पांडुरंग प्रभुणे होते. मुजुमदारांकडे ते दत्तक गेले. पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे ते चोवीस वर्षे चिटणीस होते.
१९७७ : केसरबाई केरकर साहित्य नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित जयपूर-अतरौली घराण्याच्या भारतीय शास्त्रीय गायिका (जन्म: १३ जुलै १८९२)
१९८४ : बिकीनि चे निर्माते लुई रायर्ड यांचे निधन. (जन्म: १६ सप्टेंबर १९८४)
१९९४ : जयवंत दळवी साहित्यिक, नाटककार व पत्रकार. कथा, कादंबरी, नाटक, प्रवासवर्णन, विनोदी लेख असे विविध प्रकार त्यांनी हाताळले. ते 'ठणठणपाळ' या टोपणनावाने विनोदी व मार्मिक लेखन करीत. (जन्म: १४ ऑगस्ट १९२५)
२००५ : लेसर चे शोधक गॉर्डन गूल्ड यांचे निधन. (जन्म: १७ जुलै १९२०)
२०१२ : आयमॅक्स चे सहसंस्थापक रोमन कोरियटर यांचे निधन. (जन्म: १२ डिसेंबर १९२६)
२०१७ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय वायुदलाचे वरिष्ठ अधिकारी मार्शल अर्जन सिंह यांचे निधन.



राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# सहकारी बँक मार्फत पेट्रोल पंप चालवले जावेत -मा.केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे

## सेवा सहकारी सोसायटीच्या उत्कर्षासाठी केंद्र सरकारचे प्रयत्न -आ. लोणीकर

जालना । प्रतिनिधी

दि जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., जालना यांची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाली.

यावेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे, आमदार संतोष पाटील दानवे , बँकेच्या उपाध्यक्ष निर्मलाताई निर्मलाताई दीपक राव मरकड माजी अध्यक्ष सतीश राव टोपे यांच्यासह संचालक मंडळ विविका सोसायटीचे चेअरमन बँकेचे सभासद यांची उपस्थिती होती

यावेळी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी जालना जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने उंच भरारी घेण्यासाठी पेट्रोल पंप चालवण्यासारखे उपक्रम हाती घ्यावेत त्यासोबत बँकेच्या प्रगतीसाठी सर्व संचालक मंडळाने एकत्रित येऊन काम करावे असे आवाहन यावेळी त्यांनी केले

पुढे पुढे श्री दानवे म्हणाले की, या बँकेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलायचा असेल तर पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी बँकांच्या धरतीवर आपल्याला काम करणे आवश्यक असल्याचे सांगितले

यावेळी माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी बँकेच्या संचालक मंडळाने एकत्रितपणे काम करून बँकेचा नावलौकिक वाढ व्हावा व नफा वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत शेतकऱ्यांची बँक म्हणून बँकेला नवा रुपाला आणण्यासाठी वेळ द्यावा लागेल असेही या वेळी ते म्हणाले

पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की, केंद्र सरकारने राज्यातील सोसायटीसाठी स्वतःची इमारत व सोसायटीचे सक्षमीकरण करण्यासाठी पुढाकार घेतलेला असून, या माध्यमातून सोसायटी समृद्ध होतील ज्या माध्यमातून शेतकरी सभासदांना मोठा फायदा होईल अशी यावेळी त्यांनी सांगितले



पुढे आमदार बबनराव लोणीकर म्हणाले की , कृषी उत्पन्न बाजार समिती यांच्या गट सचिवांना पंचायत समिती जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांसारखा शासकीय पगार करावा यासाठीही शासन प्रयत्नशील असल्याचे सांगितले, पुढे आमदार लोणीकरांनी सहकाराच्या माध्यमातून समृद्धीकडे जाण्यासाठी राज्य व केंद्र सरकार विशेष प्रयत्न करत असल्याची सांगितले

सभेत बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांनी बँकेचा वार्षिक अहवाल सभेसमोर मांडला. या अहवालातून बँकेच्या आर्थिक स्थितीत झालेली सुधारणा, वाढलेला निव्वळ नफा, ठेवींमध्ये झालेली वाढ, शेतकरी सभासदांना करण्यात येणारे कर्जवितरण, विमा संरक्षण तसेच आधुनिक बँकिंग व सायबर सुरक्षा सुविधांची माहिती त्यांनी उपस्थित सभासदांना दिली.

निव्वळ नफा ५.५९ कोटींवर

वार्षिक अहवाल सादर करताना राहुल लोणीकर यांनी सांगितले की, सन २०२५ अखेर बँकेचा निव्वळ नफा २.०७ कोटी रुपये होता. त्यात लक्षणीय वाढ होऊन सन २०२६ अखेर बँकेने ५.५९ कोटी रुपयांचा निव्वळ नफा मिळविला असल्याचे सांगितले

वर्षांपासूनचा संचित तोटा मार्च २०२५ अखेर निरंक झाला असून, सन २०२६ अखेर बँकेकडे ५.५९ कोटी रुपयांचा संचित नफा असल्याचे त्यांनी सांगितले.

बँकेच्या ठेवींमध्येही वाढ झाली असून, सन २०२५ मधील ५८८.४८ कोटी रुपयांच्या ठेवी वाढून ६५५.६० कोटी झाल्या असल्याचे राहुल लोणीकर यांनी सांगितले.

सभेतील विविध विषयांवर चर्चा होऊन उपस्थित सभासदांनी मांडलेल्या प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली. बँकेच्या आर्थिक प्रगतीबद्दल समाधान व्यक्त करत आगामी काळात शेतकरी, सभासद आणि सहकारी संस्थांना अधिक सक्षम आर्थिक सेवा देण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी माजी मंत्री रावसाहेब दानवे आमदार बबनराव लोणीकर, आमदार नारायण कुचे आमदार संतोष दानवे पाटील अरविंद चव्हाण बँकेच्या उपाध्यक्ष निर्मलाताई दिपकराव मरकड, माजी अध्यक्ष सतीश राव टोपे शितलताई कुचे मनीषा ताई उडान, संदीप गोरे मनीषाताई गोरे शाळीग्राम मस्के भीमराव जावळे, भाऊसाहेब जाधव कल्याणराव खरात, जहीर भाई यांच्यासह संचालक मंडळाचे पदाधिकारी बँकेचे सभासद सोसायटी यांची चेअरमन यांची मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आझाद क्रांती सेनेच्या उदगीर-जळकोट विधानसभा प्रमुखपदी किरण सूर्यवंशी गुडसूरकर यांची नियुक्ती

**गुडसूर । प्रतिनिधी**

येथील शासकीय विश्रामगृहात आझाद क्रांती सेनेच्या वतीने सामाजिक विषयांवर विशेष चर्चा बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस उदगीर, जळकोट व अहमदपूर तालुक्यातील सामाजिक क्षेत्रात कार्यरत प्रमुख कार्यकर्ते व समाजबांधव उपस्थित होते.

बैठकीदरम्यान समाजातील विविध अडचणी, सामाजिक प्रश्न तसेच त्यावर संघटितपणे काम करण्याच्या उपाययोजनांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आझाद क्रांती सेनेचे सेना प्रमुख माननीय राजेश भाऊ घोडे साहेब यांच्या विचारांचा धागा पुढे नेत सामाजिक प्रश्नांसाठी संघटनेच्या माध्यमातून प्रभावीपणे काम करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.यावेळी किरण सूर्यवंशी गुडसूरकर यांची आझाद क्रांती सेनेच्या उदगीर-जळकोट विधानसभा प्रमुखपदी जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांच्या नेतृत्वाखाली उदगीर, जळकोट व अहमदपूर तालुक्यांची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. बैठकीस ॲड. बालाजी गडकर साहेब, प्रा. गोटमुकले सर तसेच सामाजिक कार्यकर्ते रतन सूर्यवंशी साहेब यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी सामाजिक प्रश्न, संघटनात्मक बांधणी तसेच समाजाच्या विकासासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने व सातत्याने काम करण्याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.



उदगीर तालुका कार्यकारिणी
तालुका अध्यक्ष : मल्हारी संजीव काळे
तालुका उपाध्यक्ष : नागेश उमाकांत सूर्यवंशी
तालुका कार्याध्यक्ष : अमोल गोरख सूर्यवंशी
तालुका सचिव : सतीश निवृत्ती गोटामुकले
तालुका सहसचिव : सुनील लांडगे

अहमदपूर तालुका कार्यकारिणी
तालुका अध्यक्ष : देविदास मारोती कांबळे
तालुका उपाध्यक्ष : विजय बब्रुवान सूर्यवंशी
तालुका सचिव : नवनाथ धोंडिबा वाघमारे

जळकोट तालुका कार्यकारिणी
तालुका अध्यक्ष : गोविंद अण्णाराव अदावले
तालुका उपाध्यक्ष : सदानंद गणेशा गायकवाड
तालुका कार्याध्यक्ष : राजकुमार बाबुराव गुडसुरे

**गावोगावी 'दलित विकास पाहणी अभियान' राबविणार**

आगामी काळात आझाद क्रांती सेनेच्या वतीने लातूर जिल्ह्यातील गावोगावी जाऊन 'दलित विकास पाहणी अभियान' राबविण्यात येणार आहे. या अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक गावातील दलित वस्त्यांची प्रत्यक्ष पाहणी करून तेथील मूलभूत सुविधा, रस्ते, पाणी, वीज, स्वच्छता, नाली व्यवस्था, सामाजिक सभागृह तसेच इतर विकासकामांची सद्यस्थिती जाणून घेण्यात येणार आहे. दलित वस्त्यांमधील प्रलंबित व रखडलेल्या विकासकामांचा विकास आराखडा तयार करून संबंधित प्रश्न शासन व प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्यात येणार आहेत. तसेच या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी आझाद क्रांती सेनेच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करण्यात येणार आहे.

गावोगावी प्रत्यक्ष पाहणी करून विकासाची वस्तुस्थिती समोर आणणे, दलित वस्त्यांमधील मूलभूत सुविधांचे प्रश्न अधोरेखित करणे आणि वंचित घटकांच्या विकासाला गती देणे, हा या अभियानाच प्रमुख उद्देश असल्याचे यावेळी सांगण्यात आले.नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी संघटनेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नांना वाचा फोडून सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सक्रियपणे काम करण्याचा निर्धार व्यक्त केला. या बैठकीमुळे उदगीर-जळकोट-अहमदपूर परिसरातील संघटनात्मक बांधणीला अधिक बळ मिळणार असून आगामी काळात सामाजिक प्रश्नांवर व्यापक स्वरूपात काम केले जाणार असल्याचे उपस्थित कार्यकर्त्यांनी सांगितले.



**श्रावण मास समाप्ती निमित्त श्री मत्सोदरी देवी संस्थान अध्यक्ष तथा तहसीलदार श्री सोमेश मोहिते व स्नेहल सोमेश मोहिते यांच्या हस्ते अभिषेक, नैवद्य आणि आरती संपन्न करण्यात आली. यावेळी संस्थान विश्वस्त पुजारी श्री गीताविलास कुंठेफळकर संस्थान व्यवस्थापक श्री कैलास शिंदे , अभिषेक करणाऱ्यांनी व संस्थान ला सहकार्य करणारे भाविक भक्तांनी प्रसादाचा लाभ घेतला . यावेळी संस्थान कर्मचारी अर्जुन शिंदे , गोविंद कायस्थ, नामदेव राठोड यांची उपस्थिती होती.**

# घरात साठवा, शाळेत पाठवा उपक्रमाची माऊंट लिटेरा झी स्कूलमध्ये सुरुवात

अंबड । प्रतिनिधी

प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन तसेच प्लास्टिकच्या अतिवापराबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने नगर परिषद अंबडच्या वतीने घरात साठवा, शाळेत पाठवा या विशेष उपक्रमाची सुरुवात माऊंट लिटेरा झी स्कूल, अंबड येथे करण्यात आली.

मा. नगराध्यक्षा श्रीमती देवयानी केदार कुलकर्णी व मा. मुख्याधिकारी श्री. राहुल सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नगर परिषद अंबडचे पाणीपुरवठा व स्वच्छता अभियंता श्री. गणेश ठुबे तसेच शहर समन्वयक अधिरा बागुल यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना उपक्रमाची माहिती देण्यात आली.




या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी आपल्या घरातील स्वच्छ व कोरडे प्लास्टिक इतर कचऱ्यापासून वेगळे करून जमा करावे, असे आवाहन करण्यात आले. खाऊचे व चॉकलेटचे रॅपर, प्लास्टिकच्या पिशव्या, विविध वस्तूंचे स्वच्छ प्लास्टिक पॅकेजिंग आदी प्लास्टिक जमा करता येणार आहे. संकलित केलेले प्लास्टिक प्लास्टिकच्या बाटलीत अथवा कापडी पिशवीत साठवून ठेवावे आणि दि. २८ सप्टेंबर २०२६ रोजी शाळेत आणून जमा करावे, असे सांगण्यात आले. शाळेत जमा होणारे प्लास्टिक नगर परिषद अंबडच्या स्वच्छता विभागामार्फत संकलित करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा उद्देश केवळ प्लास्टिक संकलित करणे नसून विद्यार्थ्यांमध्ये प्लास्टिकचा वापर कमी करणे, वापरलेले प्लास्टिक स्वतंत्रपणे ठेवणे आणि त्याची योग्य विल्हेवाट व पुनर्चक्रणासाठी व्यवस्था करणे, या सवयी रुजविणे हा आहे.

विद्यार्थ्यांच्या माध्यमातून घराघरांत कचरा वर्गीकरणाची सवय निर्माण व्हावी, तसेच स्वच्छता व पर्यावरण संवर्धनाचा संदेश शाळेपासून कुटुंब आणि समाजापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

नगर परिषद अंबडच्या वतीने माऊंट लिटेरा झी स्कूलचे विद्यार्थी व पालकांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून घरातील स्वच्छ प्लास्टिक वेगळे जमा करावे व दि. २८ सप्टेंबर रोजी शाळेत आणून द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नागरिकांनी स्वच्छता सेवा उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा -सीईओ डॉ कृष्ण कांत कनवारिया

जालना । प्रतिनिधी

स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत स्वच्छता ही सेवा २०२६ पंधरवडा दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत स्वच्छते मध्ये सहभाग, स्वच्छ भारत, विकसित भारत या थीमखाली साजरा करण्यात येत असून या अभियानात जास्तीत जास्त नागरिकांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ कृष्ण कांत कनवारिया यांनी विभाग प्रमुखांच्या बैठकीत केले. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, प्रकल्प संचालक सुशील कुमार पठारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र तुबाकले, प्रकल्प संचालक लिंबाजी बारगीरे यांच्या सह अनेकांची उपस्थिती होती.

केंद्र व राज्य शासनाच्या सुचनेनुसार हा उपक्रम जिल्ह्यातील सर्व गावांमध्ये राबविला जात आसुन. या मोहिमेत जिल्ह्यातील सर्व नागरिक, संस्था, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था, महिला बचत गट तसेच विविध विभागांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,तसेच

**स्वच्छता ही सेवा पंधरवडा म्हणजे केवळ मोहिम नसून हा सामूहिक कृतीचा उत्सव आहे. १७ सप्टेंबर रोजी गावागावात प्रभात फेरी व सेवा ज्योत या उपक्रमाचे आयोजन केले असून जिल्ह्यातील सर्व नागरिकांच्या सहभागातूनच जालना जिल्हा स्वच्छ, निरोगी व सुजल बनविण्याचे ध्येय साध्य होईल. डॉ कृष्ण कांत कनवारिया**
**मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जालना**

या पंधरवड्या दरम्यान प्रमुख उपक्रमांतर्गत अस्वच्छ ठिकाणांची निवड करून साफसफाई करणे, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता, सफाईमित्र सुरक्षा शिबिरे, पर्यावरणपूरक व शून्य कचरा उत्सव, स्वच्छ सुजल गाव संकल्पनेशी निगडित प्रबोधनपर कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. तसेच दि. १ ऑक्टोबर २०२६ रोजी एक दिवस - एक तास - एक सोबत या संकल्पनेतून देशव्यापी श्रमदान आयोजित करण्यात आले आहे. या दिवशी जास्तीत जास्त नागरिकांनी आपल्या गावात सामूहिक श्रमदान करून स्वच्छता मोहिमेला हातभार लावावा, तसेच जिल्हाभरात जास्तीचा पाऊस झाला असल्यामुळे गावातील नाल्या द्वारे पाणी गावात साचले असून गावातील नाल्या वाहत्या करणे तसेच पूरग्रस्तांना आवश्यक ती मदत करण्याबाबतही आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ कृष्ण कांत कनवारिया यांनी जिल्हा परिषदेत आयोजित करण्यात आलेल्या प्रमुखांच्या बैठकीत केले आहे.

# राशनकार्ड सुरु करण्यासाठी २ हजारांची लाच घेताना स्वस्त धान्य दुकानदार एसीबीच्या जाळ्यात

जालना । प्रतिनिधी

बंद असलेले राशन कार्ड पुन्हा सुरू करून त्यावर रेशन देण्यासाठी २ हजार रुपयांची लाच मागणाऱ्या स्वस्त धान्य दुकानदाराला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) रंगेहाथ पकडले.

शैलेश जीवनलाल ककड (वय ४८), व्यवसाय स्वस्त धान्य दुकान चालक, रा. शास्त्री मोहल्ला, जुना जालना, ता. जि. जालना, असे आरोपीचे नाव आहे.

या प्रकरणातील तक्रारदार हे ७९ वर्षीय असून ते रोजंदारीवर काम करतात. त्यांचे राशन कार्ड बंद असल्याने ते सुरू करून रेशन देण्यासाठी आरोपीने २ हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती.

तक्रारीची पडताळणी केल्यानंतर दि. १५ सप्टेंबर २०२६ रोजी भवानी नगर, जुना जालना येथील स्वस्त धान्य दुकान क्रमांक ६८ येथे एसीबीच्या पथकाने सापळा रचला. यावेळी आरोपीने तक्रारदाराकडून २ हजार रुपयांची लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्याला ताब्यात घेतले.

या प्रकरणी जालना शहर पोलिस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ मधील कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली आरोपीस दि.१५.०९.२०२६ रोजी ११.१२ वाजता ताब्यात घेण्यात आले आहे.

सापळा अधिकारी
श्री. बी. एस. जाधवर, पोलीस उप अधीक्षक ला. प्र. वि. जालना

सापळा पथक
१) पो.ह. गजानन घायवट २) पोअं/मनोहर भुतेकर, ३) गणेश चेके ४) अमोल चेके ५) शिवलिंग खुळे ६) चा.पो.हवा. भालचंद्र बिनोरकर.

मार्गदर्शन
श्रीमती. माधुरी केदार कांगणे पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर
श्री शशिकांत सिंगारे अपर पोलीस अधीक्षक छत्रपती संभाजीनगर

# पंचनामे न झाल्याने संतप्त शेतकऱ्याने पेटविले सोयाबीन

धाराशिव । प्रतिनिधी

पावसाअभावी सोयाबीन पिकाचे नुकसान मोठे झाले असूनही पंचनामे न झाल्याने संतप्त झालेल्या तुळजापूर तालुक्यातील किलज येथील युवा शेतकऱ्याने हगलूर शिवारातील आपल्या शेतातील सोयाबीन पेटवून दिले.

किलज येथील रहिवासी असलेल्या अजित पवार यांची हगलूर शिवारात शेती आहे. पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने त्यांच्या शेतातील सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मात्र, अद्याप पिकाचे पंचनामे झाले नसल्याने त्यांनी संताप व्यक्त केला.

पावसाअभावी सोयाबीनचे पीक हातचे गेले असून, उरलेले पीक काढण्यासाठीही पैसे नसल्याचे पवार यांनी सांगितले. त्यामुळे आपल्या तीन एकर दोन गुंठे क्षेत्रातील सोयाबीन पेटवून देत असल्याचे त्यांनी सांगितले.

पिकाचे नुकसान होऊनही शासनाकडून अद्याप मदत मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे. आता तरी शासनाला जाग येऊन दुष्काळ जाहीर करावा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तत्काळ आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी अजित पवार यांनी केली.

# पाचोड परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ; महादेव मंदिरांच्या दानपेट्यांसह किराणा दुकान फोडले

संभाजीनगर । प्रतिनिधी

पैठण तालुक्यातील पाचोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरीच्या घटनांचे सत्र सुरूच असून, शेतकऱ्यांच्या सोलर पंपांच्या वायर व मोटारींच्या चोरीचा तपास अद्याप लागलेला नसतानाच अज्ञात चोरट्यांनी दोन महादेव मंदिरांच्या दानपेट्यांसह किराणा दुकानावर डल्ला मारल्याची घटना समोर आली आहे. वारंवार घडणाऱ्या चोरीच्या घटनांमुळे परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पाचोड पोलिसांच्या तपास कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

मागील दोन आठवड्यांपूर्वी विहामांडवा, खंडाळा परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतातील सोलर पंपांच्या वायर व मोटारी चोरीला गेल्या होत्या. या घटनांचा तपास अद्याप पूर्ण झालेला नसतानाच सोमवारी (दि. १४) रात्री अज्ञात चोरट्यांनी पुन्हा धुमाकूळ घातला. नगदेश्वर महादेव मंदिर तसेच देवगाव येथील महादेव मंदिरातील दानपेट्या फोडून चोरट्यांनी रोकड लंपास केल्याचे समोर आले आहे. त्याच रात्री आडुळ खुर्द येथील एका किराणा दुकानालाही चोरट्यांनी लक्ष्य केले. या घटनांमुळे परिसरातील नागरिकांमध्ये खळबळ उडाली आहे.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पाचोड पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आल्याचे सांगितले जात असताना चोरीच्या घटना सुरूच असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. बंदोबस्त असतानाही चोरट्यांना पोलिसांचा धाक राहिलेला नाही का, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, या चोरीच्या घटनांकडे पोलीस अधीक्षकांनी गांभीर्याने लक्ष देऊन चोरट्यांचा बंदोबस्त करावा तसेच प्रलंबित चोरीच्या घटनांचा तपास तातडीने लावावा, अशी मागणी शेतकरी व नागरिकांतून होत आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र

बुधवार दि.१६ सप्टेंबर २०२६ | ६

# युवा संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाची फडणवीस यांच्यासोबत चर्चा

## प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होणार नसल्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही – डॉ. ओमप्रकाश शेटे

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव धरणाची उंची वाढवण्याच्या निर्णयाविरोधात लढा देणाऱ्या युवा संघर्ष समितीच्या शिष्टमंडळाची भेट आज राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्याशी झाली. आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष तथा माजलगावचे नेते डॉ. ओमप्रकाश शेटे यांच्या विशेष पुढाकारातून ही भेट पार पडली. प्रकल्पग्रस्तांवर कुठल्याही प्रकारचा अन्याय होणार नसल्याची ग्वाही मुख्यमंत्री महोदयांनी दिली असल्याचे डॉ. ओमप्रकाश शेटे यांनी सांगितले.

**“एकाही शेतकऱ्यावर आणि प्रकल्पग्रस्तावर अन्याय होता कामा नये ही फडणवीस साहेब व सरकारची भूमिका आहे. संबंधित यंत्रणेकडून वस्तुनिष्ठ अहवाल प्राप्त झाल्यानंतर माजलगाव धरण उंची वाढीच्या निर्णयाला स्थगिती मिळेल. मुख्यमंत्री महोदय नक्कीच शेतकऱ्यांच्या बाजूने सकारात्मक निर्णय घेतील, यात शंका नाही. मी स्वतः युवा संघर्ष समिती व शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.**
**– डॉ. ओमप्रकाश शेटे (अध्यक्ष आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती)**

यावेळी शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांसमोर वस्तुस्थिती मांडली की, माजलगाव धरणाच्या उंची वाढीला २२ गावांचा तीव्र विरोध आहे. सन १९८०-८५ मध्ये धरणासाठी ३० ते ३२ गावांचे पुनर्वसन झाले असून, त्यातील अनेक शेतकरी भूमिहीन झाले आहेत. आता पुन्हा उंची वाढवल्यास माजलगाव, वडवणी आणि गेवराई तालुक्यातील शेकडो हेक्टर सुपीक शेती पाण्याखाली जाणार आहे. धरणाची उंची वाढवण्याऐवजी धरणातील गाळ उपसा करावा किंवा बॅरेजेस बांधण्याचा पर्याय निवडावा अशी मागणी शिष्टमंडळाने केली.



यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी अत्यंत स्पष्ट भूमिका मांडत, एकाही शेतकऱ्यावर आणि प्रकल्पग्रस्तावर अन्याय होऊ देणार नाही, असे आश्वस्त केले. त्यांनी राज्याचे अतिरिक्त मुख्य सचिव एकनाथ डवले यांना आदेशित केले की, या संपूर्ण प्रकरणाचा तत्काळ वस्तुनिष्ठ अहवाल सादर करावा. त्यामुळे धरणाची उंची वाढवण्याची कोणतीही पुढील कार्यवाही होणार नाही, हे निश्चित झाले आहे. त्यानंतर शिष्टमंडळाने एकनाथ डवले यांची प्रत्यक्ष भेट घेऊन, प्रशासकीय यंत्रणेला योग्य त्या सूचना देण्याबाबत सविस्तर चर्चा केली.

# दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्याने बर्दापूर फाटा येथे रास्ता रोको आंदोलन

## या आंदोलनात शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे –अविनाश मोरे पाटील



बर्दापूर । प्रतिनिधी

सध्या राज्यांमध्ये पावसाने मोठा खंड निर्माण झाल्याने शेतकऱ्याच्या हातात तोंडाशी आलेला घास निसर्गाच्या लहरीपणपणामुळे हातचा गेला आहे त्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ बी वरील लातूर आंबेजोगाई या महामार्गावरील बर्दापूर फाटा येथे दिनांक १६ सप्टेंबर २०२६ बुधवार रोजी सकाळी ठीक दहा वाजता शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे जिल्हा परिषद सदस्य अविनाश मोरे पाटील यांनी शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

राज्यामध्ये व मराठवाड्यामध्ये पावसाचा मोठा खंड निर्माण झाला आहे त्यामुळे शेतकऱ्यावर उपासमारीसह आर्थिक नियोजन पूर्णतः कुल मोडून गेल्याचे दिसून येत आहे त्या अनुषंगाने शासनाने मागील वर्षीच्या अतिवृष्टीमुळे राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हेक्टरी सतरा हजार पाचशे रुपये मदत जाहीर केली होती त्या अतिवृष्टीची रक्कम शेतकऱ्यांना न मिळाल्याने शेतकरी चिंतेत असतानाच यावर्षी २०२६ मध्ये मोजक्याच पावसावर शेतकऱ्यांनी पेरणी करून लाखो रुपयांचा खर्च करून काळा आईची ओटी भरली होती पण या काळ्या आईने शेतकऱ्यांना भरभरून देण्याचा प्रयत्न केला असताना ऑगस्ट आणि सप्टेंबर मध्ये पावसाचा खंड निर्माण झाल्याने हाता तोंडाशी आलेले पिके ही करपून गेली आहेत तर जनावरांच्या चाऱ्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे या धर्तीवर जिल्हा परिषदेचे सदस्य अविनाश मोरे पाटील यांनी शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहून शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी बर्दापूर फाटा येथे रास्ता रोको आंदोलन करण्याचे ठरवले आहे त्यात विशेष मागणी म्हणजे २०२६ मध्ये कोरडा दुष्काळ जाहीर

◀◀ पान ३ वर

# शासकीय खरेदी केंद्रावर कापूस विक्रीसाठी ‘कपास किसान’ ॲपवर नोंदणी करा–नरवडे

माजलगाव । प्रतिनिधी

कापूस हंगाम २०२६-२७ मध्ये भारतीय कापूस महामंडळ (CCI) मार्फत किमान आधारभूत किंमत (MSP) अंतर्गत कापूस विक्रीचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ‘कपास किसान’ मोबाईल पवर नोंदणी करावी,तसेच नोंदणी करतेवेळी काही अडचण आल्यास बाजार समिती कार्यालयामध्ये नोंदणी कक्ष स्थापन करण्यात आला असून तेथे येऊन नोंदणी करून घ्यावी असे आवाहन माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त अण्णा नरवडे, उपसभापती श्रीहरी नाना मोरे, सचिव हरिभाऊ सवणे यांनी केले आहे.



सीसीआयच्या सूचनेनुसार, कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी १ सप्टेंबर २०२६ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत ‘कपास किसान’ पवर आपली नोंदणी करणे आवश्यक आहे. पवर नोंदणी केल्यानंतर शेतकऱ्यांना MSP अंतर्गत कापूस खरेदीची सेवा तसेच संबंधित खरेदी प्रक्रियेची माहिती सहज उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. नोंदणीसाठी शेतकऱ्यांनी कापूस पिकाचा पेरा असलेली सातबारा प्रत,

◀◀ पान ३ वर

# महात्मा गांधी विद्यालयात हिंदी दिवस साजरा

पाटोदा । प्रतिनिधी

महात्मा गांधी माध्यमिक विद्यालय, नायगाव येथे १४ सप्टेंबर रोजी असणारा हिंदी दिवस शाळेला सुट्टी असल्यामुळे १५ सप्टेंबर रोजी साजरा करण्यात आला.यावेळी हिंदी विषयाचे शिक्षक सय्यद सज्जाद सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,

१४ सप्टेंबर १९४९ रोजी भारतीय संविधान सभेने हिंदीला देवनागरी लिपीत संघाची राजभाषा म्हणून स्वीकारले. त्यामुळे हा दिवस हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. हिंदी भाषा ही भारताच्या एकात्मतेला जोडणारी महत्त्वाची भाषा असल्याचे त्यांनी सांगितले. हिंदी भाषेचा इतिहास, साहित्यिक व सांस्कृतिक महत्त्व तसेच आधुनिक हिंदी साहित्याचे जनक भारतेंदू हरिश्चंद्र यांच्या योगदानाची माहिती दिली तसेच विविध क्षेत्रात हिंदी भाषेचा वापर होताना आपण पाहतो असे सांगून विद्यार्थ्यांना हिंदी दिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास मुख्याध्यापक श्री.सातपुते सर, श्री.सानप सर, श्री. पाखरे सर, श्री. सय्यद सर, श्री. चौरे सर, श्री. काशीद सर, श्रीमती ठोंबरे मॅडम, श्रीमती काशीद मॅडम, कर्मचारी श्री.शेलार, श्री. जायभाय तसेच विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्ग नोव्हेंबरपर्यंत पूर्ण होणार

## बीड-परळी टप्प्यातील सर्व अडथळे दूर

बीड । प्रतिनिधी

मराठवाड्याच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाकांक्षी ठरणाऱ्या अहिल्यानगर-बीड-परळी वैजनाथ या २६१ किलोमीटर लांबीच्या नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्गाचे काम आता अंतिम टप्प्यात आले आहे. बीड ते परळी या उर्वरित टप्प्यातील सर्व प्रशासकीय व तांत्रिक अडचणी दूर करण्यात प्रशासनाला यश आले असून, नोव्हेंबर २०२६ अखेरपर्यंत हा संपूर्ण मार्ग वाहतुकीसाठी सज्ज करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

प्रकल्पाची सद्यस्थिती व ठळक मुद्दे

१९८.५ किमीचे काम पूर्ण: एकूण २६१ किमीच्या या रेल्वे मार्गापैकी १९८.५ किमी लांबीच्या मार्गाचे काम यशस्वीरीत्या पूर्ण झाले आहे.

उर्वरित ६२.५ किमीचे आव्हान: बीड ते परळी या उर्वरित ६२.५ किमी मार्गातील सर्व भूसंपादन, तांत्रिक व प्रशासकीय अडथळे आता मार्गी लागले आहेत येत्या १७ सप्टेंबरपासून बीड ते पुणे थेट रेल्वे सेवा सुरू होत आहे. त्यामुळे जिल्ह्याला थेट राजधानी व औद्योगिक शहराशी मोठी कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. बीड ते पुणे रेल्वे सुरू झाल्यानंतर आता रेल्वे प्रशासनाने उर्वरित बीड-परळी टप्प्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण करण्यासाठी संपूर्ण ताकद पणाला लावली आहे.

जिल्ह्याच्या विकासाला मिळणार गती

नगर ते परळी हा संपूर्ण मार्ग पूर्ण झाल्यानंतर बीड जिल्हा थेट मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्राशी अधिक सक्षमपणे जोडला जाईल. प्रवासी वाहतुकीसोबतच मालवाहतुकीला मोठी चालना मिळून जिल्ह्यातील कृषी व औद्योगिक विकासाला गती मिळणार आहे. हे उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी रेल्वे प्रशासकीय यंत्रणा कामाला लागली आहे.

# गेवराईच्या जामिया तय्यबुल उलूमचे अक्रमभाई पठाण यांचे दुःखद निधन

गेवराई । प्रतिनिधी



गेवराई येथील जामिया तय्यबुल उलूमच्या सेवेसाठी आपले संपूर्ण आयुष्य वाहून घेणारे प्रामाणिक सेवेकरी (खादिम) अक्रमखान अहमदखान पठाण यांचे मंगळवार, दिनांक १५ सप्टेंबर २०२६ रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी यांचे वय ५८ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली असा परिवार आहे. ते गेवराईचे माजी नगरसेवक सय्यद नजीब चाचू यांचे चुलत सासरे आणि सय्यद एजाज मेंबर यांचे जवळचे नातलग होते. विशेष म्हणजे अक्रमभाई यांना कोणत्याही प्रकारचे व्यसन किंवा आजार नव्हता. ते नेहमी मदरसाच्या सेवेत व्यस्त असायचे. त्यांची नमाज-ए-जनाजा मंगळवारी दुपारी जोहरच्या नमाज नंतर शहरातील मरकज मस्जिद परिसरात अदा करण्यात आली. याप्रसंगी मुस्लिम बांधव बहुसंख्येने उपस्थित होते. अक्रमभाई यांच्या निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# शिवसेनेचे बीड लोकसभा संपर्कप्रमुख अशोक सपकाळ यांचा परळी येथे सत्कार



परळी वैजनाथ । प्रतिनिधी

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड लोकसभा संपर्कप्रमुख अशोक सपकाळ यांनी परळी वैजनाथ येथे भेट दिली. यावेळी शिवसेनेच्या उपनेत्या प्रा. सुषमा ताई अंधारे यांच्या संपर्क कार्यालयात त्यांचा शाल, श्रीफळ, हार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी शिवसेनेचे मा. जिल्हाप्रमुख रत्नाकर शिंदे, उपजिल्हाप्रमुख नारायण सातपुते, तालुकाप्रमुख भोजराज पालीवाल, उपतालुकाप्रमुख महेश केंद्रे, बीड जिल्हा महिला संघटक मीरा ताई नवले यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्कारानंतर अशोक सपकाळ यांनी परळी वैजनाथ येथील श्री प्रभू वैद्यनाथ मंदिरात जाऊन दर्शन घेतले. तसेच योगेश्वरी देवीचेही दर्शन घेण्यात आले. यावेळी बीड जिल्ह्यावर आलेले दुष्काळाचे संकट दूर व्हावे, शेतकरी व सर्वसामान्य जनतेला दिलासा मिळावा आणि जिल्ह्यात सुख-समृद्धी नांदावी, यासाठी श्री प्रभू वैद्यनाथ व योगेश्वरी देवीला साकडे घालण्यात आले.

या भेटीमुळे शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आगामी काळात पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# सार्वजनिक कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांत संघभावना अन् नेतृत्वगुण विकसित होतात : डॉ. आदिती सारडा

बीड । प्रतिनिधी

गणेशोत्सवासारख्या सार्वजनिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना केवळ सांस्कृतिक अनुभवच मिळत नाही, तर त्यांच्यात नेतृत्वगुण, संघभावना, नियोजनकौशल्य आणि जबाबदारीची जाणीव विकसित होते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी अशा कार्यक्रमांना संस्था नेहमीच प्रोत्साहन देते, असे प्रतिपादन आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांनी केले.

## आदित्य शिक्षण संस्थेच्या कॅम्पसमध्ये गणेशोत्सवाचा थाट



आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ. आदित्य सारडा, संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थांच्या सर्वांगीन विकासासाठी नेहमीच विविध कार्यक्रमाचे अयोजन संस्थेच्या वतीने केले जात आहे. त्याच दृष्टीकोणातून आदित्य शिक्षण संस्थेच्या बी-कॅम्पसमध्ये यंदाच्या गणेशोत्सवाचा शुभारंभ मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाला. श्रींच्या मूर्तीची

◀◀ पान ३ वर

# दुष्काळाचे सावट असतानाही गणरायाचे जल्लोषात आगमन

## शहरासह ग्रामीण भागात ढोल-ताशांच्या गजरात गणरायाचे उत्साहात स्वागत

माजलगाव । प्रतिनिधी

एकीकडे पावसाने ओढ दिल्याने दुष्काळाचे सावट गडद होत असताना दुसरीकडे विघ्नहर्त्या गणरायाच्या आगमनाने माजलगाव शहरासह ग्रामीण भागात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.गणेश भक्तांनी पारंपरिक वाद्यांच्या गजरात, ढोल-ताशांच्या दणदणाटात आणि ‘गणपती बाप्पा मोरया’च्या जयघोषात लाडक्या गणरायाचे मोठ्या भक्तिभावाने स्वागत केले.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध मंडळांनी आकर्षक सजावट,विद्युत रोषणाई आणि देखावे साकारले आहेत. सकाळपासूनच गणेशमूर्तींची विधिवत पूजा करून प्रतिष्ठापनेसाठी मिरवणुका काढण्यात आल्या. ढोल-ताशांच्या तालावर तरुणाईसह





महिला,बालक आणि ज्येष्ठ नागरिकांनीही उत्स्फूर्त सहभाग घेतला. ग्रामीण भागातही गणरायाच्या आगमनाचा उत्साह पाहायला मिळाला.अनेक गावांमध्ये पारंपरिक पद्धतीने गणेशमूर्तींची मिरवणूक काढण्यात आली. गावागावांत ‘गणपती बाप्पा मोरया,मंगलमूर्ती मोरया’च्या जयघोषाने वातावरण भक्तिमय झाले.

यंदा पावसाअभावी शेतकरी आणि ग्रामीण जनतेसमोर आर्थिक अडचणींचे संकट असले तरी गणरायाच्या आगमनाचा आनंद मात्र प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दिसून आला. दुष्काळाचे संकट दूर होऊन सुख-समृद्धी, समाधान आणि भरपूर पाऊस पडावा,अशी प्रार्थना गणेशभक्तांकडून करण्यात आली. गणेशोत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली असून, नागरिकांनीही शांतता आणि सामाजिक सलोखा राखत उत्सव साजरा करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दुष्काळाच्या छायेतही भक्ती आणि उत्साहाचा रंग अधिक गडद करत गणरायाचे झालेले आगमन सर्वांच्या मनात आशावाद निर्माण करणारे ठरले आहे.

# स्वतःतील टॅलेंट ओळखा, नवे मार्ग शोधा –प्रसिद्ध कवी संदीप जगताप

माजलगाव । प्रतिनिधी

आजची वैचारिक अवस्था ढासळत चालली असून प्रत्येकाने आपल्या विचारांची कक्षा व्यापक केली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीमध्ये काही ना काही टॅलेंट असते. विद्यार्थ्यांनी इतरांचे अनुकरण करण्यापेक्षा स्वतःतील गुणांचा शोध घेऊन त्याला योग्य दिशा द्यावी. जगासमोरील प्रश्न बदलले आहेत; असे प्रतिपादन प्रसिद्ध कवी व विचारवंत संदीप जगताप यांनी सुंदरराव सोळंके महाविद्यालयात सुंदरराव सोळंके व्याख्यानमालेचे उद्घाटन करताना व्यक्त केले.




विद्यार्थ्यांमध्ये वैचारिक प्रगल्भता, सृजनशीलता आणि सामाजिक जाणिवा निर्माण करण्याच्या उद्देशाने सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या वतीने आयोजित तीन दिवसीय व्याख्यानमालेचे पहिले पुष्प उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ड. बी. आर. डक होते, तर उद्घाटक म्हणून संदीप जगताप उपस्थित होते.

यावेळी प्राचार्य डॉ. अभय सोळुंके, उपप्राचार्य डॉ. एम. ए. कव्हळे, उपप्राचार्य प्रकाश गवते, उपप्राचार्य पवनकुमार शिंदे, मराठी विभागप्रमुख

◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26